# FORM A

## PUBLIC ANNOUNCEMENT

(Under Regulation 6 of the Insolvency and Bankruptcy Board of India (Insolvency Resolution Process for Corporate Persons) Regulations, 2016)

FOR THE ATTENTION OF THE CREDITORS OF ALUMAYER INDIA PRIVATE LIMITED

| RELEVANT PARTICULARS | | |
|---|---|---|
| 1. | Name of corporate debtor | Alumayer India Private Limited |
| 2. | Date of incorporation of corporate debtor | 29/01/1998 |
| 3. | Authority under which corporate debtor is incorporated / registered | Company Incorporated under the Companies Act, 1956 registered with Registrar of Companies, Maharashtra (Mumbai) |
| 4. | Corporate Identity No. / Limited Liability Identification No. of corporate debtor | U99999MH1998PTC113324 |
| 5. | Address of the registered office and principal office (if any) of corporate debtor | Office No.1002 10th Floor, Building No.A1 Rupa Solitaire, Sector 1, Mbp, Mahape Navi Mumbai Thane MH 400710 IN. |
| 6. | Insolvency commencement date in respect of corporate debtor | Hon'ble NCLT Mumbai Bench Pronounced the Order on:- **6th July, 2022**<br>Copy of the Order was received on:- **15th July, 2022** |
| | Estimated date of closure of insolvency resolution process | 2nd January, 2023 |
| 7. | Name and registration number of the insolvency professional acting as interim resolution professional | Mr. Rajas Shreeram Bodas<br>Registration No.IBBI/IPA-002/IP-NO1200/2021-2022/14010 |
| 9. | Address and e-mail of the interim resolution professional, as registered with the Board | **Address**: - Survey No 997/18, Satsang Society, Suraksha Apartments, Navi Peth, Near Vaikunth,Pune, Maharashtra,411030.<br><br>**Email**:-rajasbodas1@gmail.com |
| 10. | Address and e-mail to be used for correspondence with the interim resolution professional | **Address**: - Survey No 997/18, Satsang Society, Suraksha Apartments, Navi Peth, Near Vaikunth,Pune, Maharashtra,411030.<br><br>**Email**: - alumayercirp@gmail.com |
| 11. | Last date for submission of claims | **29th July, 2022** |
| 12. | Classes of creditors, if any, under clause (b) of sub-section (6A) of section 21, ascertained by the interim resolution professional | Not Applicable |
| 13. | Names of Insolvency Professionals identified to act as Authorised Representative of creditors in a class (Three names for each class) | Not Applicable |
| 14. | (a) Relevant Forms and<br><br>(b) Details of authorized representatives are available at: | Web link:https://ibbi.gov.in/en/home/downloads<br><br>Not Applicable |

Notice is hereby given that the National Company Law Tribunal has ordered the commencement of a corporate insolvency resolution process of the **Alumayer India Private Limited** on **6th July, 2022.**

The creditors of **Alumayer India Private Limited**, are hereby called upon to submit their claims with proof on or before **29th July, 2022**to the interim resolution professional at the address mentioned against entry No. 10.

The **financial creditors** shall submit their claims with proof by **electronic means only**. All other creditors may submit the claims with proof in person, by post or by electronic means.

A financial creditor belonging to a class, as listed against the entry No. 12, shall indicate its choice of authorised representative from among the three insolvency professionals listed against entry No.13 to act as authorised representative of the class in Form CA. [Not Applicable]

Submission of false or misleading proofs of claim shall attract penalties.

RAJAS SHREERAM BODAS ★ Insolvency Professional ★ IP Regn. No. IBBI/IPA-002/ IP-No1200/ 2021-2022/ 14010

Mr. Rajas Shreeram Bodas
Interim Resolution Professional
Registration No.IBBI/IPA-002/IP-NO1200/2021-2022/14010
Date:- 18th July, 2022
Place:- Pune

100 शताब्दी वर्ष
निर्भीड पत्रकारितेचे शताब्दी वर्ष

R.N.I.No.1814/57
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL

• मुंबई, सोमवार १८ जुलै, २०२२ • वर्ष-१००, अंक-१३३, पाने-८, किंमत : ₹ ५
• Issue - 133 Vol.- 100 Marathi - Daily - Mumbai, 18 July, 2022 Page- 8 Price- Rs. 5/-
• 24x7 : www.navakal.in संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com



## सिंधूने पटकावले सिंगापूर ओपन

**सिंगापूर -** भारताची स्टार बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू हिने सिंगापूर ओपन २०२२ मध्ये विजेतेपद पटकावत ऐतिहासिक कामगिरी केली. दोनवेळा ऑलिम्पिक पदक विजेती असलेल्या पीव्ही सिंधूने अंतिम फेरीत चीनच्या वांग जी यीचा २१-९, ११-२१, २१-१५ असा पराभव केला. जागतिक क्रमवारीत सातव्या क्रमांकावर असलेल्या पीव्ही सिंधूने उपांत्य फेरीत जपानच्या सायना कावाकामीला पराभूत केले होते. सिंधूने उपांत्य फेरीत २१-१५, २१-७ अशा फरकाने सहज विजय मिळवला होता. त्यावेळी जपानी खेळाडू कावाकामी एकदाही सिंधूवर भारी पडलेली दिसली नाही.

# शिंदे गट आणि उद्धव ठाकरेंची दोन दिवसांत भेट

## भाजप नेत्याची मध्यस्थी! दीपाली सय्यद यांच्या ट्विटने खळबळ

**शिंदे गटाच्या बंडखोरीमुळे शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच गरम असताना काल मध्यरात्री मराठी अभिनेत्री आणि शिवसेनेच्या नेत्या दीपाली सय्यद यांच्या एका ट्विटने एकच खळबळ उडाली आहे. भाजप नेत्याच्या मध्यस्थीने येत्या २ दिवसांत एकनाथ शिंदे गट आणि उद्धव ठाकरे यांची भेट होणार आहे, असे दीपाली सय्यद यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले.**

■ मुंबई

**शिवसेनेचे** नेते एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी करत भाजपच्या मदतीने राज्यात सत्ता स्थापन केली. त्यानंतर राज्यातील शिवसेनेचे नगरसेवक आणि पदाधिकारी शिंदे गटात सामील होऊ लागल्यामुळे शाखा पातळीपर्यंत शिवसेनेत उभी फूट पडली आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून रोज शिवसेनेचे नेते आणि शिंदे गटातील आमदारांमध्ये एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. अशा परिस्थितीत काल मध्यरात्री मराठी अभिनेत्री आणि शिवसेनेच्या नेत्या दीपाली सय्यद यांनी एक ट्विट करत एक फोटो शेअर केला. या फोटोमध्ये शिवसेनेचा धनुष्यबाण आणि त्यांचा फोटो आणि मजकूर टाकला आहे. या मजकूरात त्या म्हणाल्या आहेत की, येत्या दोन दिवसांत आदरणीय उद्धवसाहेब आणि आदरणीय शिंदेसाहेब शिवसैनिकांच्या भावनांचा आदर करून पहिल्यांदा चर्चा करायला एकत्र येणार, हे ऐकून खूप बरं वाटलं. शिंदेसाहेबांना शिवसैनिकांची तळमळ समजली आणि उद्धवसाहेबांनी कुटुंबप्रमुखाची भूमिका मोठ्या मनाने निभावली, हे स्पष्ट झालं. ही मध्यस्थी करण्याकरता भाजपा नेत्याने मदत केली याबाबत धन्यवाद. चर्चेच्या ठिकाणाची प्रतीक्षा असेल, असे दीपाली सय्यद यांनी म्हटले आहे. त्यांच्या या




ट्विटमुळे राज्याच्या राजकारणात एक खळबळ उडाली.

या ट्विटवरून शिवसेनेचे प्रवक्ते आणि राज्यसभेचे खासदार संजय राऊत म्हणाले की, दीपाली सय्यद अभिनेत्री आहेत. त्या पक्षाचे काम करतात, त्या प्रवक्ता नसताना त्यांना हे अधिकार कोणी दिले याची मला माहिती नाही. त्यांनी अशा प्रकारची वक्तव्ये खूप काळजीपूर्वक करणे गरजेचे आहे. त्यांच्या या ट्विटमुळे राजकीय चर्चेचे वादळ पेटल्यानंतर दुपारी १२ वाजता दीपाली सय्यद यांनी स्वत: पत्रकार परिषद घेतली. त्यात त्या ठामपणे म्हणाल्या की, मला जाणवले ते मी ट्विटमध्ये बोलले आहे. मी दोन्ही पान ७ वर


### शिवसेनेच्या याचिकांवर बुधवारी कोर्टात सुनावणी

राज्यातल्या सत्ता संघर्षाबाबत सुप्रीम कोर्टाने खंडपीठाची स्थापना केली आहे. भारताचे सरन्यायाधीश एन.व्ही. रमणा यांच्या अध्यक्षतेखाली या खंडपीठाची स्थापना करण्यात आली आहे. या खंडपीठामध्ये रमणांसोबत न्या. कृष्णा मुरारी आणि न्या. हिमा कोहली यांचाही समावेश आहे. शिवसेनेकडून बंडखोर आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात जवळपास सात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकांवर रमणा यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर बुधवार, २० जुलैला सुनावणी होणार आहे.

## छत्तीसगड काँग्रेसमध्ये उभी फूट? टी.एस. सिंहदेव यांनी दिला राजीनामा

■ रायपूर

**महाराष्ट्रानंतर** आता छत्तीसगडमध्ये मोठा राजकीय भूकंप होण्याची शक्यता आहे. छत्तीसगडचे पंचायत मंत्री टी. एस. सिंहदेव यांनी राजीनामा दिल्यानंतर काँग्रेसमध्ये फूट पडण्याची चिन्हे आहेत. प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या भाजपने मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्यावर हल्ला चढवला आहे. सिंहदेव यांच्या राजीनाम्यामुळे या सरकारमधील अनेक मंत्री नाराज असल्याचे आणि त्यांच्यात खदखद असल्याचे



स्पष्ट होते, असे भाजपचे नेते माजी मुख्यमंत्री डॉ. रमण सिंह यांनी सांगितले. त्यामुळे छत्तीसगडमध्येही बंडखोरी होण्याची आणि सरकार कोसळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सिंहदेव हे बघेल सरकारमधील दुसऱ्या क्रमांकाचे ज्येष्ठ मंत्री होते. जनता जाहीरनामा अंमलबजावणीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. राज्य सरकारला इथपर्यंत आणण्यात मोठे योगदान दिले. त्यांची राजकारणात अतिशय महत्त्वाची भूमिका आहे. पण आज ते नाराज आहेत. निराश आणि हताश झाले आहेत. अशीच स्थिती छत्तीसगडच्या सर्व मंत्र्यांची आहे. प्रत्येक जण नाराज आहे. महाराष्ट्रासारखीच छत्तीसगडमध्ये परिस्थिती निर्माण होत आहे.

## आज राष्ट्रपतीपदाची निवडणूक देशाला मिळणार नवे राष्ट्रपती

■ मुंबई

**राष्ट्रपती पदाच्या** निवडणुकीसाठी आज मतदान होणार आहे. २१ जुलैला मतमोजणी आहे. विरोधी पक्षांच्या संयुक्त आघाडीचे राष्ट्रपतीपदाचे उमेदवार यशवंत सिन्हा यांनी आपली उमेदवारी दिली आहे. एनडीएकडून द्रौपदी मुर्मू यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. राष्ट्रपती निवडणुकीकरिता आज सकाळी १० ते सायं. ५ वा.या कालावधीत विधान भवन, मुंबई येथे मतदान होणार आहे. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत ४,८०९ मतदार असतील, ज्यामध्ये ७७६ खासदार आणि ४,०३३ आमदार आहेत. यामध्ये राज्यसभेच्या २३३ आणि लोकसभेच्या ५४३ सदस्यांचा समावेश आहे.

काल भाजपाकडून उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी जगदीप धनखड यांना उमेदवारी देण्यात आली. त्यानंतर आज शरद पवार यांच्या दिल्लीतील निवासस्थानी युपीएची बैठक पार पडली. या बैठकीत उपराष्ट्रपती पदासाठी राजस्थानच्या माजी राज्यपाल मागरिट अल्वा यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

## अब्दुल सत्तार यांच्या सूत गिरणीला शिंदे सरकारने १५.१७ कोटी दिले

■ मुंबई

**शिवसेनेचे** बंडखोर अब्दुल सत्तार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील नव्या सरकारचे पहिले लाभार्थी आमदार ठरले आहेत. राज्य सरकारच्या वेबसाईटवरील माहितीनुसार अब्दुल सत्तार यांच्या सिल्लोड येथील राष्ट्रीय सहकारी सूतगिरणीला सरकारने १३ जुलै २०२२ रोजी १५.१७ कोटी मंजूर केले आहेत. सत्तार यांचा मुलगा समीर सूतगिरणीचे नेतृत्व करतो. ८० कोटींच्या या प्रकल्पासाठी हा निधी



राज्याचे भाग भांडवल म्हणून दिला आहे.

सिल्लोडमधील सूतगिरणीचे आपण प्रवर्तक आहोत. माझा मुलगा समीर तिचे नेतृत्व करतो. यामुळे औरंगाबाद परिसराचा विकास होण्यास मदत होईल. सूतगिरणीसाठी राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळेल याची आम्हाला खात्री आहे. त्यामुळे ही मिल आम्ही लवकरच सुरू करू, असे अब्दुल सत्तार यांनी सांगितले. २०१९ मध्ये सत्तार शिवसेनेच्या तिकिटावर सिल्लोडमधून आमदार म्हणून निवडून आले. ठाकरे सरकारमध्ये ते राज्यमंत्री होते. नंतर एकनाथ शिंदे यांच्या बंडखोर गटात ते सहभागी झाले. आता शिंदे सरकारमधील ते पहिले बंडखोर लाभार्थी आमदार ठरले आहेत. ७ जुलैला राज्य सरकारने त्यांच्या ८० कोटींच्या प्रकल्पाला मंजुरी दिली.

## ज्ञानवापी प्रकरणाची २२ जुलैला सुनावणी

■ वाराणसी

**वाराणसी** काशी विश्वनाथ मंदिर-ज्ञानवापी मशीद प्रकरणाची सुनावणी अलाहाबाद उच्च न्यायालयाने पुढे ढकलली आहे. त्यामुळे यावर २२ जुलैला सुनावणी होणार आहे. प्रतिवादीचे वकील विजय शंकर रस्तोगी यांनी केलेल्या विनंतीवरून न्यायालयाने सुनावणी पुढे ढकलली. वाराणसीच्या अंजुमन इंताजामिया मशिदीने १९९१ मध्ये जिल्हा न्यायालयात दाखल केलेल्या मूळ खटल्याच्या पुनर्संचियतेला आव्हान देणारी याचिका दाखल केली आहे. मशिदीच्या ठिकाणी प्राचिन मंदिर होते. मशीद मंदिराचा भाग आहे, असा दावा याचिकेत केला आहे.

## ‘आरे’साठी पर्यावरणवाद्यांचे प्रत्येक रविवारी होणार आंदोलन

■ मुंबई

**आरे** मेट्रो कारशेडच्या विरोधात पर्यावरणवादी पुन्हा एकवटले आहे. संतप्त आंदोलकांनी आम्ही प्रत्येक रविवारी सरकारच्या विरोधात आंदोलन करू असा पवित्रा घेतला आहे. आरे जंगल वाचले पाहिजे, आरेला जंगल घोषित करा अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. कांजूरमार्ग येथील जागा ही मेट्रो-३सह, मेट्रो ४, मेट्रो ६ आणि मेट्रो १४ साठीदेखील फायदेशीर ठरणार असल्याचे दावा आरे बचाव कार्यकर्त्यांनी केला. या आंदोलनात पर्यावरण प्रेमी, आरे तील निवासी,मुंबईकरही सहभागी झाले होते. आरे येथील पिकनिक पॉईंट या आंदोलनस्थळी मोठा पोलिस बंदोबस्त करण्यात आला आहे.

महाविकास आघाडी सरकारने आरे कारशेडला स्थगिती दिली होती. शिंदे-फडणवीस हे सत्तेत आल्यावर त्यांच्याकडून स्थगिती उठवण्यात आल्यामुळे आता सरकार आणि पर्यावरणवादी यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. आरे हे जंगल १,८००एकर वनक्षेत्र वसलेले आहे.

## या सरकारला घटनात्मक वैधता नाही संजय राऊत-आशिष शेलारांत जुपली

■ मुंबई

**संजय** राऊत यांनी नव्या सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत फक्त दोनच मंत्री असल्याने त्यांनी घेतलेले निर्णय अवैध असल्याचा दावा केला आहे. यावर भाजपच्या आशिष शेलार यांनी अहो तुम्हाला कायदा, संविधान काही तरी कळते का? असा सवाल केला आहे. खासदार संजय राऊत आणि भाजप आमदार आशिष शेलार यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहे.

संजय राऊत यांनी आपल्या पोस्ट मध्ये भारतीय राज्यघटनेच्या कलम १६४(१अ)चा दाखला देत राज्यपाल भगतसिंह



कोश्यारी यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. राऊतांनी सवाल केला आहे की, ‘राज्यपाल, हे काय सुरू आहे?’ राऊत म्हणतात, की भारतीय राज्यघटनेच्या कलम १६४(१अ) नुसार राज्याचे मंत्रिमंडळ किमान १२ मंत्र्यांचे असणे बंधनकारक आहे. त्यापेक्षा कमी संख्येच्या मंत्रिमंडळाला घटनेची मान्यता नाही. गेले २ आठवडे महाराष्ट्रात २ मंत्र्यांचे मंत्रिमंडळ जे निर्णय घेतेय त्याला घटनात्मक वैधता नाही. आशिष शेलार यांनी देखील संजय राऊत यांना कायद्याच्या भाषेत उत्तर दिले आहे. शेलार म्हणतात, महाविकास आघाडीत ७ जणांच्या मंत्रिमंडळाने ३२ दिवस निर्णय घेतले आणि आता म्हणे संविधानाचे अनुच्छेद १६४(१अ) सांगते.

## रुद्रप्रयागात भूस्खलन बद्रिनाथ महामार्ग बंद

■ सार

**पावसामुळे** उत्तराखंड येथील अनेक भागांत भूस्खलनाच्या घटना घडत आहेत. राज्यात डोंगरापासून मैदानापर्यंत पावसाचा कहर सुरू असून, नदी-नाले दुथडी भरून वाहत आहेत. रस्त्यावर मातीचा ढिगारा आणि खड्डे पडल्याने अनेक गावांचा संपर्क बंद झाला आहे. त्यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यातच रुद्रप्रयागमध्ये काल जोरदार पावसामुळे भूस्खलन झाले. भुस्खलनामुळे बद्रिनाथ-ऋषिकेश राष्ट्रीय महामार्गावरील डोंगराचा काही भाग कोसळला. त्यामुळे हा महामार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. रुद्रप्रयागमध्ये अनेक दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. पावसामुळे डोंगरांना तडे जात आहेत.

## राजापूरच्या अनुस्कुरा घाटात दरड कोसळली

■ रत्नागिरी

**कोकण** आणि पश्चिम महाराष्ट्राला जोडणाऱ्या अनुस्कुरा घाटात आज पहाटे ५ च्या सुमारास पुन्हा दरड कोसळली. त्यामुळे घाटात मोठी वाहतूक कोंडी झाली होती. रस्त्यावर कोसळलेली दरडी हटवल्यानंतर काही तासांनी एकेरी आणि दुपारनंतर वाहतूक पूर्ववत सुरू झाली. या दुर्घटनेमुळे रत्नागिरी येथून राजापूर-कोल्हापूर मार्गे पुण्याला जाणारी एसटी बस घाटात अडकली होती.

### वाहतूक विस्कळीत

कोकण आणि परिसरात पडत असलेल्या पावसामुळे येथील अनेक घाटांत दरडी कोसळण्याच्या घटना घडत आहेत. आज पहाटे ५ च्या सुमारास अनुस्कुरा घाटात दरड कोसळली. याची माहिती मिळताच सार्वजनिक बांधकाम विभागाने दरडी हटवण्याचे काम हाती घेतले. त्यामुळे काही वेळानंतर एकेरी वाहतूक सुरू झाली. दुपारनंतर घाटातील वाहतूक पूर्ण सुरू झाली. ४ दिवसांपूर्वी याच घाटात दरड कोसळून वाहतूक विस्कळीत झाली होती.

## शारजातून हैदराबादला निघालेल्या विमानाचे कराचीत इमर्जन्सी लँडिंग

**पंधरा दिवसांतील ही दुसरी वेळ**

■ इस्लामाबाद

**शारजा** येथून हैदराबादला जात असलेल्या इंडिगो विमानात आज आकाशातच तांत्रिक बिघाड निर्माण झाला. त्यामुळे त्याचे कराची विमानतळावर इमर्जन्सी लँडिंग झाले. यामुळे प्रवाशांचे प्राण वाचले. २ आठवड्यांत कराचीत भारतीय विमानाचे झालेले हे दुसरे इमर्जन्सी लँडिंग आहे. यापूर्वी स्पाईस जेटचे विमान कराची विमानतळावर उतरवावे लागले होते.




शारजा येथून प्रवाशांना घेऊन हैदराबादकडे निघालेल्या इंडिगो एअरलाइनच्या विमानात आज आकाशातच तांत्रिक बिघाड झाल्याचे वैमानिकाच्या लक्षात आले. त्यानंतर त्याने हे विमान पाकिस्तानला वळवले. नंतर ते कराची विमानतळावर उतरवले. त्यामुळे विमानातील प्रवासी सुखरूपपणे बचावले. इंडिगो एअर लाईन्सनेही या घटनेला दुजोरा दिला आहे. विमानात तांत्रिक बिघाड झाल्याचे वैमानिकाच्या लक्षात येताच वैमानिकाने ते कराचीत उतरवले. या प्रवाशांना हैदराबादला आणण्यासाठी खास विमान कराचीला पाठवले आहे, असे इंडिगोने सांगितले. यापूर्वी ५ जुलैला दिल्लीतून दुबईला जाणाऱ्या स्पाईसजेट विमानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे ते कराचीत उतरवले होते. त्यावेळीही प्रवासी थोडक्यात बचावले होते.

## नमाज पठणविरोधात हनुमान चालिसा लखनऊमधील लुलू मॉलबाहेर निदर्शने

■ लखनऊ

**उत्तर प्रदेशातील** लखनऊ शहरात असलेल्या प्रसिद्ध लुलू मॉलमध्ये काही जणांनी नमाज पठण केल्याच्या निषेधार्थ हनुमान चालिसा वाचण्यासाठी जाणाऱ्या करणी सेनेच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी हुसकावून लावले. शनिवारी भगवे झेंडे घेऊन जय श्री राम-जय हनुमानाच्या घोषणा देत करणी सेना आणि राष्ट्रीय हिंदू संरक्षण दलाच्या कार्यकर्त्यांनी जोरदार निदर्शने केली. यावेळी पोलिसांनी मॉलमध्ये प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांना रोखले. यानंतर कार्यकर्त्यांनी मॉलबाहेरच हनुमान चालिसा वाचण्यास सुरुवात केली.

पोलिसांनी लाठीमार करून त्यांना हुसकावून लावताना कार्यकर्त्यांची पोलिसांशी झटापट झाली. पोलिसांनी मॉलबाहेर आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना पकडले. २० कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले असून मॉलची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. राष्ट्रीय हिंदू संरक्षक दलाचे अध्यक्ष आदित्य मिश्रा

### २० जण ताब्यात

हे १२ हून अधिक कार्यकर्त्यांसह शनिवारी दुपारी १ वाजता लुलू मॉलमध्ये पोहोचले. त्यांना हनुमान चालिसाचे पठण करायचे होते. पोलिसांनी त्यांना मॉलच्या बाहेरच रोखले. आदित्य मिश्रा म्हणाले की, जेव्हा मॉलमध्ये नमाज अदा होत असते, तेव्हा आम्हाला हनुमान चालिसा वाचण्यापासून का रोखले जात आहे असा सवाल केला.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा

मोबा.८१०८११६४२३

## पाहिजेत

आश्रममध्ये कामासाठी पुरुष/महिला पाहिजेत. राहणे-खाणे फ्री, पगार 6000 - 8000. मीरारोड / ऐरोली - **8779694066** {NC221246}

घरकामासाठी महिला/मुली/मुले. (भरपूर पगार) (राहण्या-खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC221471}

ALL मुंबई सिक्युरीटी गार्ड, सुपरवायझर पाहिजेत कमवा. 18500/- - 35000/- राहणे फ्री **9987125325** {NC221380}

ब्युटिशियन, सुलुनसाठी 9 तास मुले/मुली पाहिजेत. पगार 15000/- वसई - **9158556298** {NC221532}

**पाहिजेत**
सिक्युरीटी गार्ड / सुपरवायझर्स / अनुभवी ट्रेनिंग ऑफिसर
— (ड्युटी ८/१२ तास) —
पगार १८०००/- ते २००००/- S.G. / S.S.
P.F. E.S.I.C. सुविधेसह
ओरीजनल कागदपत्रांसहित ६००/- रू. युनिफॉर्मसाठी आणणे
परेल, मुलुंड
**अलर्ट सिक्युरीटी**
ऑफिस नं. ५, पहिला मजला, राऊत इंडस्ट्रिअल प्रिमायसेस, इंडिअन ऑईल पेट्रोल पंपा शेजारी, सेनापती बापट मार्ग, माहिम (वेस्ट)
**9223334957/50/56/55 9967763221 / 9223349161**

साफसफाई घरकाम भांडी घासणे महिला सकाळी 8 वाजता रु. 5000/- + पास माटुंगा (पूर्व), खालसा कॉलेज जवळ, मो. **8898674988** {NCC220937}

पॅटर्न मेकर व सुतारकाम करणारा पाहिजे. **9967808824** गिरगाव {NCC220935}

घरबसल्या आईस्क्रिम चमचे पॅकिंग काम हप्ता ७००० मो : **7045251173** {NC221486}

घरबसल्या चॉक (खडू) पॅकिंग काम हप्ता १०००० कमवा मो.- **8425896515** {NC221485}

अनुभवी सिक्युरिटी गार्ड दहिसर (ईस्ट) येथे पाहिजेत. पगार 14500/- अनुभवी हाऊसकिपिंगसाठी मुले पाहिजेत. संपर्क : **9820219764 / 9921942211** {NC221530}

पेशंटकेअर ड्युटीसाठी 12/24 तासांसाठी बांद्रा ते बोरीवलीमध्ये राहणारे आया, वॉर्डबॉय पाहिजेत. बोरीवली **9322463312** {NC221516}

फ्री जॉब ! नो प्लेसमेंट Pvt. Ltd. कंपनीला अंधेरी, मुंबई, ठाणेमधील बँकेसाठी अनुभवी हाऊसकिपिंग मुले/मुली, सुपरवायझर मुले पाहिजेत. पगार बँकेच्या नियमानुसार. **9619371438** {NC221478}

साकीनाका येथे पंचिंग ऑपरेटर पाहिजेत. संपर्क : **9773559172 / 8591635928** {NC221528}

बेलापूरस्थित नामांकित प्रॉपर्टी एजन्सीला, अनुभवी अथवा विनानुभवी सेल्स एक्झिक्युटिव्ह त्वरित पाहिजेत. 2 व्हीलर ड्रायव्हींग लायसन्सधारी मुलांना प्राधान्य. पगार 12000-15000 योग्यतेनुसार. थेट संपर्क करा : **9930331505** {NC221512}

गव्हर्मेंट अस्थापना कलिना, पुणे, नागपूर, नाशिक करिता शिपाई आणि मुंबई करिता लॅब टेक्निशियन, नर्स, वॉर्डबॉय, ऑफिस मॅनेजर, रिसेप्शनिस्ट पाहिजेत. पत्ता शार्प सर्व्हिसेस 202/2 राजगीर अॅनेक्स, लक्ष्मी बाग, सायन ब्रीजखाली, सायन (w), संपर्क : **9082772768** Email ID sharpservices@rediffmail.com {NC221547}

मालाड (ईस्ट) स्टेशन जवळ पुरुष / स्त्री टेलीकॉलर पाहिजेत. पगार 12 हजार पर्यंत. मराठी बोलायला सक्षम. वय 30 खाली. **9222222248** {NC221548}

कांदिवली येथील एका नामांकित हॉस्पिटलकरिता अनुभवी वॉर्डबॉय व आयाबाई पाहिजेत. 8 तास ड्युटी पगार 10000/-, 12 तास ड्युटी पगार 13500/- वयोमर्यादा 18 ते 35 सर्व कागदपत्रांसह संपर्क - **9082600478 / 9920530142** {NC221559}

वाशी येथील एका नामांकित हॉस्पिटलकरिता अनुभवी वॉर्डबॉय व आयाबाई पाहिजेत. 8 तास ड्युटी पगार 12000 + PF + ESIC सर्व कागदपत्रासहीत संपर्कः **9769767449/ 9167785544** {NC221558}

फार्मेक्स इंडिया कंपनीमध्ये पॅकिंग करण्यासाठी महिला-पुरुष पाहिजेत. पगार: १४५००-१८५००. संपर्क : **7304048796/ 7718022349 / 7304289373** {NC221522}

अंधेरीत रेडीमेड दुकान / कारखान्यात कामासाठी मुले / मुली पाहिजेत भेटा 12 ते 2.30 पत्ता : राजुभाई हरगोविंदास, शॉप नं. 8, रुबी अपार्टमेंट, एम व्ही रोड, विशाल हॉलजवळ, अंधेरी (पूर्व) मुंबई 400069. {NC221462}

## पाहिजेत

घाटकोपर (असल्फा) प्रिंटिंग प्रेसमध्ये कटिंग मशीनसाठी बाईंडर पाहिजेत. संपर्क वेळ - ११ ते ७. फोन - **9082044933 / 9819996770** {NC221503}

दिंडोशी-गोरेगांव येथे माळी पाहिजे. पगार 14500/- फोन : **7977596442** {NC221515}

पुणे शहरात मध्यवर्ती ठिकाणी 28"x 40" फोर कलर हेडलबर्ग ऑफसेट मशिन व 25"x 36" टू कलर हेडलबर्ग ऑफसेट मशिनवर क्वालिटी काम करणारे अनुभवी ऑपरेटर, फिडरमन पाहिजे. संपर्क - **9372455647 / 9822352233** {NCC220927}

ओला / उबेरसाठी ड्रायव्हर पाहिजेत. कमवा 30000 + महिना, कॉल करा. एव्हरेस्ट फ्लीट : **9736003003** {NC221531}

कॉस्मेटिक, जीन्स, टीशर्ट पॅकिंग सिक्युरिटीसाठी मुले मुलींची भरती कमवा. 16000-24000 **7718097879** {NC221509}

घाटकोपर (असल्फा) प्रिंटिंग प्रेसमध्ये हेल्पर पाहिजेत. संपर्क वेळ - ११ ते ७. फोन - **9082044933 / 9819996770** {NC221573}

FREE भरती ! रॉयल स्मार्ट फॅसिलिटीला हाऊसकिपर, हाऊसकिपिंग सुपरवायझर, सिक्युरिटीगार्ड, कॉम्प्युटर ऑपरेटर. राहण्याची - जेवण्याची सुविधा. **8828365829/ 9167113207 / 7021121099** {NC221574}

खारघर मध्ये 2 व्हिलर लायसेन्स लोडर, डिलिव्हरी बॉय पाहिजेत **7045976442.** {NC221571}

अनुभवी मुले/मुली GEM PORTAL वर काम करण्यासाठी पाहिजेत. **9223429671** {NCC220930}

**कुरिअरसाठी डिलिव्हरी मुले पाहिजेत. मोबाईल (Android) + दहावी पास प्रमाणपत्र** Interview **वेळ 12.30 pm - 3.30 pm डिलिव्हरीचे ठिकाण - नवी मुंबई, मुलुंड, ठाणे, विक्रोळी, घाटकोपर, चर्चगेट, दादर, लोअरपरेल दररोज रोख 500/- रु. पास + बस तिकिट Speedman Express 191-B 9th cavel X lane 1st floor, Dr. Vigas street, Kalbadevi Road, Mumbai - 400002.** {NCC220931}

Divekar food FMCG नमकिन मॅन्युफॅक्चरींग कंपनीला सेल्सगर्ल, सेल्समनची गरज आहे. इच्छुक व्यक्तीने संपर्क साधावा. **9320173882 / 7400093733** {NC221577}

**ठाणे हॉटेलसाठी अनुभवी स्टाफ हवा. 9136745671 {NCC220938}**

कांदिवली कंपनी मध्ये ऑफिस बॉय मुले पाहिजेत **9920480316.** {NC221578}

दादरमधील गणपती डेकोरेशन शॉपसाठी 45 वयापर्यंतचे हेल्पर्स पाहिजेत. जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य. **9819656579 / 9323464916** {NC221576}

त्वरित एअरपोर्ट जॉब भर्ती लोडर, हाऊसकिपिंग, ग्राऊंड काऊंटर स्टाफ, सुपरवायझर ड्रायव्हर, सिक्युरिटी गार्ड, सॅलरी 12000 - 45000 PF, ESIC, FOOD, प्रवास. संपर्क - राज **8976314229** परी **8591912932** {NCC220934}

असिन पॉवर प्रा.लि. ठाणे (इलेक्ट्रिकल बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टींग कंपनीला अनुभवी उमेदवार पाहिजेत.) (फ्रेशर/सिनियर) इंजिनियर / सुपरवायझर, सेफ्टी ऑफीसर, लेबर कॉन्ट्रॅक्टर (इलेक्ट्रिकल), बिलिंग ऑफिसर (एक्सेल नॉलेज) मोबाईल - **8425816604** {NC221580}

सराऑगी मॅटर्निटी आणि जनरल हॉस्पिटलसाठी सिनियर नर्स आणि मावशी पाहिजे मालाड (वेस्ट) आणि घाटकोपर (वेस्ट) पगार अनुभव प्रमाणे संपर्क - **09987522054 / 08108596729 / 09372179410** {NC221581}

सीएसटी मुंबई येथील पेस्ट कंट्रोल कंपनीला फवारणी करणारे अनुभवी ऑपरेटर्स तसेच मार्केटिंगसाठी हुशार मुले पाहिजेत. **8356824867** {NCC220940}

हेल्पर कम डिलीव्हरी बॉय पाहिजे. ओम साई प्रिंट, दादर **9820008412** {NC221582}

## Situation Vacant

Diploma / ITI electronic engineer require for Timer, Controller testing at Bhayandar. Whatsapp **9820165432.** {NC221426}

Required Calling Specialists and marketing executives with excellent communication skills. Goregaon East for an educational institute of govt university. Call- **9920829736.** {NC221544}

## Situation Vacant

**REQUIREMENT**
*FOR PACKAGING UNIT*
Heidelberg 4/6 Color CD Machine
• Operator / Feederman / Boiler
• Bobst Punching Operator
• Corrugation Pasting Operator
Experience 3-4 years
**ABI PRINT**
Plot no. D-20/12, TTC Ind. Area, MIDC, Turbhe, Indira Nagar. Navi Mumbai 400705 Opp BMW Service Center
**88980 09898 98200 61921**
Email abiprint.20@gmail.com

FDA APPROVED PHARMA LAB REQUIRES : BACK OFFICE SENIOR ASSISTANT, CUSTOMER CARE MARKETING, SENIOR ACCOUNT ASSISTANT & OUT DOOR OFFICE WORK (FOR CENTRAL RAILWAY) Contact : MAHESH MOBILE : **9820149622** {NCC221579}

## Education

DO DIRECT SSC, HSC, BA, BCOM, BSC, MBA, DIPLOMA **9168088740** {NCC221470}

## पार्टटाईम जॉब

JIO मॅसेज पाठवण्याचे काम 25000/--45000/- (Reg. -999/-) **6397747171, 9389525534** {NCC221570}

## कर्ज विषयक

LIC पॉलिसीवर कॅशकर्ज (LIC मध्ये गहाण व हरवलेल्या) पॉलिसीवर पुन्हा कर्ज दादर पाटील **9920762168** {NCC220939}

## व्यवसायविषयक

घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना ३० ते ३५ हजार कमवा दोन वर्षाचे अॅग्रीमेंट - **9028160157 / 9867162042** {NC221527}

## व्यसनमुक्ती

गॅरंटीने दारू... अंमली पदार्थ... सोडवा - डॉ. पालवे (C/W- **9552619752**) व्यसन + टेंशन + भीती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश.. {NCC220906}

## वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. **-मॅनेजर, नवाकाळ'**

**आईसक्रीम..** नुसतं नाव उच्चारलं तरी आपण गारेगार होऊन जातो. आईसक्रीम पार्लर असो, हॉटेल असो, घरच्याघरी तयार आईसक्रीम असो किंवा रस्त्यावरून घंटावाली गाडी घेऊन फिरणारा आइसफ्रुटवाला असो. आईसक्रीम या नावातच आपल्याला पार विरघळवून टाकायची ताकद आहे. खाऊचा इतिहास माणसांच्या संस्कृतीइतकाच जुना आहे. या इतिहासाच्या पानापानावर आपल्याला अशी वळणं आढळतात जिथे जन्माला आलेला नवा पदार्थ म्हणजे त्या प्रदेशाची ओळख ठरावा. पण जिथे ही इतिहासाची पानं धूसर होतात तिथे एखाद्या लोकप्रिय ठरलेल्या पदार्थाच्या निर्मितीवर नाव कोरायला अनेक जण पुढे सरसावतात. आईसक्रीमच्या बाबतीत नेमकं हेच झालं आहे. हा आमचा शोध आहे असं म्हणणारे अनेक आहेत. त्यामुळे आईसक्रीमचा जन्म नेमक्या कोणत्या प्रांताच्या कुशीत झाला याचे स्पष्ट दाखले नाहीत. तरीही असं म्हटलं जातं की, चीनमध्ये फार पूर्वी भात व दूध यांच्या मिश्रणातून आईसक्रीमसदृश पदार्थ तयार केला जात असे. सुप्रसिद्ध खलाशी मार्को पोलो अतिपूर्वेच्या देशांचा प्रवास करून इटलीत परतला तेव्हा सोबत काही खास पदार्थाच्या पाककृतीचा खजिना त्याच्या गाठीशी होता. त्यातच आईसक्रीमच्या पाककृतीचाही समावेश होता. पण आज ज्या पदार्थाला आपण आईसक्रीम म्हणतो ते त्या काळात मात्र 'क्रीम आइस' होतं. उन्हाळ्याच्या काळात स्वीटक्रीम किंवा कस्टर्ड थंड करण्यासाठी बर्फाचा वापर केला जायचा. तेच हे क्रीम आइस.

आईसक्रीमच्या नावाशी खूप साऱ्या थोरा-मोठ्यांची नावं जुळलेली आहेत. चीनमधून मार्को पोलोच्या माध्यमातून आईसक्रीम इटलीत पोहोचलं. इटालियन राजपुत्री कॅथरिन मेडीसीचा विवाह फ्रान्सचा राजपुत्र हेन्री दुसरा याच्याशी झाला. ती लग्नानंतर काही इटालियन शेफ आपल्या सोबत घेऊन गेली होती. इटलीकडून फ्रान्सकडे आणि मग पुढे जगभर आईसक्रीमची लोकप्रियता पसरतच गेली. मात्र त्या काळी बर्फ तयार करण्याची प्रक्रिया फारशी सोपी नव्हती. असं म्हणतात की, रोमन सम्राट 'नीरो'ने पर्वतातून बर्फ आणून आईसक्रीम तयार करण्यासाठी खास माणसं ठेवली होती. इंग्लंडचा राजा चार्ल्स पहिला याच्या जेवणानंतरच्या डेझर्ट डिशमध्ये आईसक्रीमचा समावेश हमखास असायचा. पण तो या पदार्थाबाबतीत इतका दक्ष होता की या 'फ्रोजन स्नो'ची माहिती कुणालाही कळू नये यासाठी त्याने आपल्या शेफला ही पाककृती लपवून ठेवण्याकरता आयुष्यभर पेन्शनची सोय केली होती असं म्हणतात.

**जुलै महिन्यातील तिसरा रविवार हा अमेरिकेत नॅशनल आईसक्रीम दिवस साजरा केला जातो. त्या निमित्ताने आईसक्रीमचा इतिहास.**






एकूण काय, सुरुवातीच्या काळात आईसक्रीम ही श्रीमंतांची चैन होती. आईसक्रीमकरता लागणारा बर्फ तयार करणं वा त्यासाठी बर्फाळ पर्वतरांगांत माणसं नेमणं सर्वसामान्य माणसाला परवडण्याच्या पलीकडचं होतं. पण रेफ्रिजरेटर, मोटर्स, पॅकिंग मशीन यांच्या शोधाबरोबर व प्रसाराबरोबर आईसक्रीमचं उत्पादन सर्वसामान्यांपर्यंत आलं आणि आईसक्रीम ही थोरामोठ्यांची मक्तेदारी उरली नाही. गंमत बघा, एखादा पदार्थ विशिष्ट कारणाशी अचानक जोडला जातो आणि मग त्याचा मागचा इतिहास बाजूला राहून एखाद्या नव्याच संदर्भात त्याचं समीकरण जुळतं. आईसक्रीमचंही नेमकं असंच झालं. आईसक्रीमही एकेकाळची रॉयल डिश. मात्र दुसऱ्या महायुद्धात मनाने हताश, निराश झालेल्या सैनिकांचे मनोबल वाढवणारा पदार्थ म्हणून अचानकच आईसक्रीमचं एक नवं नातं जुळलं. दुसऱ्या महायुद्धातल्या अनेक लढणाऱ्या देशांनी त्यांच्या सैनिकांना आईसक्रीम खाऊ घालण्याचा प्रयत्न केला होता असा संदर्भ आढळतो. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरिकेत आनंद साजरा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आईसक्रीम खाल्ले गेले आणि त्यातून सेलिब्रेशन आणि आइसक्रीम असं छान समीकरण तयार झालं. ब्रिटिशांच्या मार्फत भारतात रुजलेल्या आईसक्रीमशिवाय भारतीय लग्नपंगतीची कल्पना होऊ शकत नाही. लग्न, वाढदिवस, बढती असो की निवृत्तीसमारंभ असो, मित्रमैत्रिणींचा सहज भेटण्याचा प्लान असो.. या सगळ्या क्षणांची गोडी वाढवण्यासाठी आईसक्रीम हजर असतं. बऱ्याच दिवसांत खाल्लं नाही, हे चुटूकपुटूक कारणही आईसक्रीम पार्टी करायला सहज पुरतं. भारतासारख्या सतत उन्हाळलेल्या देशाला गारेगार आईसक्रीमने प्रेमात पाडलं नसतं तर नवलच होतं.

**संजीव वेलणकर पुणे**




**सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर माणसाच्या प्रत्येक भावनेसाठी आज इमोजी उपलब्ध आहेत. व्हॉट्सअॅप, मेसेंजर यांच्यामुळे इमोजी आताच्या काळात संदेश पाठवतानाच्या अविभाज्य भाग बनल्या आहेत. इतक्या की चक्क त्यांच्यासाठी स्वतंत्र दिवस सुद्धा साजरा केला जातोय. १७ जुलै २०१४ रोजी पहिला जागतिक इमोजी दिवस साजरा करण्यात आला. इमोजीपीडियाच्या जेरेमी बर्ज यांनी प्रथम या दिवसाची सुरुवात केली. भारतीय सोशल मीडिया विश्वामध्ये अनेक भाषांमध्ये वेगवेगळ्या इमोजी वापरल्या जातात.**

**तुम्हाला** ठाऊक आहे का, इमोजीची सुरुवात १९९५ च्या आसपास जपानी फोन मध्ये करण्यात आली होती!

१९९५ च्या आसपास पेजर्स वापरले जायचे त्यावेळी जपानच्या छढढ डोकोमोने एक इमोजी वापरली आणि ती प्रचंड लोकप्रिय झाली. हळूहळू इमोजी आज सर्वत्र पाहायला मिळते. फेसबुकवर व ही इमोजी गेल्या वर्षी पेक्षा यावर्षी दुपटीने वापरली गेली आहे! एकूण २८०० हुन अधिक इमोजीपैकी जवळपास सर्वच म्हणजे २३०० रोजच्या रोज वापरल्या जात आहेत! ७० कोटी इमोजी फेसबुकच्या पोस्ट्समध्ये दैनंदिन वापरल्या जात आहेत! नववर्षाच्या स्वागताला सर्वाधिक इमोजीचा वापर होतो. भारतात आनंदाचे अश्रू येणारा आणि ब्लोईंग किसचा इमोजी सर्वाधिक वापरला जातो. 'बोबल एआई' या टेक कंपनीने केलेल्या सर्वेक्षणानुसार या दोन इमोजींना भारतीयांची सर्वाधिक पसंती आहे. तर टॉप १० इमोजींमध्ये स्माइलिंग फेस विद हार्ट, किस मार्क, ओके हँड, लाऊडली क्राईंग फेस, बीमिंग फेस विद स्माइलिंग आइज, थम्स अप, फोल्डेड हँड्स आणि स्माइलिंग फेस विद सनग्लासेस यांचा समावेश आहे. ट्विटरवर भारतीय डोळ्यात पाणी येईपर्यंत हसण्याची इमोजी सर्वाधिक वापरतात.



# आयपीएल सुरू असेपर्यंत आंतरराष्ट्रीय स्पर्धा नाही

■ नवी दिल्ली

**जगातील** सर्वात मोठी क्रिकेट लीग समजली जाणारी आयपीएल म्हजेच इंडियन प्रीमिअर लीग सुरू असेपर्यंत त्याकाळात कोणतीही आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा किंवा मालिका आयोजित केली जाणार नाही, असा निर्णय आयसीसी म्हणजेच आंतरराष्ट्रीय क्रिकेट कौन्सिलने घेतला आहे. तसेच आयसीसीने दरवर्षी आयपीएलसाठी अडीच महिन्यांची विंडो देण्याचा देत पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला शह दिला आहे. कारण याला पाकिस्तान बोर्डाने विरोध केला होता तर बीसीसीआयने तशी मागणी केली होती.

आयसीसीने २०२३ ते २०२७ या कालावधीत आंतरराष्ट्रीय द्विपक्षीय मालिका आणि स्पर्धांचा भविष्यातील दौऱ्यांची आखणी केली आहे. यामध्ये आयसीसीच्या १२ पूर्णवेळ सदस्यांविरुद्धच्या सामन्यांचा समावेश आहे. तर

**आयसीसी बीसीसीआयपुढे नमली**

आयपीएलचे आयोजन मार्चच्या शेवटच्या आठवड्यापासून ते जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत करण्यात आले आहे. यामध्ये पुढील दोन वर्षात ७४-७४ सामने खेळवले जाणार आहेत. तर २०२५ आणि २०२६ मध्ये ८४ तसेच २०२७ मध्ये ९४ आयपीएल सामने खेळवले जाण्याची शक्यता आहे.मात्र आयपीएल दरम्यान आंतरराष्ट्रीय सामने होणार नाहीत.ऑस्ट्रेलियात द हंड्रेड आणि इंग्लडमध्ये बिग बाश लीग या स्पर्धा होत असते. त्यावेळी हे दोन्ही संघ आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणार नाहीत.

# राशीभविष्य

सोमवार दि. १८ जुलै २०२२

संजय मनोहर

**मेष** काही प्रमाणात तडजोड फायद्याची ठरेल. तुमचा आग्रह, हट्ट अडचणी वाढवू शकतो. प्रवासात चीजवस्तू सांभाळून असावे.

**वृषभ** पैशाच्या व्यवहारासाठीचे प्रयत्न यश देतील. नातेवाईक, भावंडांवर अवलंबून राहू नये. कोणास हातउसने पैसे देणे टाळावे.

**मिथुन** काही गोष्टी अपेक्षेनुसार घडतील. कार्यकर्तृत्वातील अडचणी तुमच्या प्रयत्नामुळे मार्गी लागतील. कमी श्रमात अधिक लाभ संभवतो.

**कर्क** नोकरीत हितशत्रू डोके वर काढतील. पैशाची, कर्जाची, उधारीची कामे मार्गी लागतील. कर्ज प्रकरणे प्रयत्नाने यश देतील.

**सिंह** काही गोष्टी मनासारख्या घडतील. जुगारसदृश्य व्यवहाराच्या बाबतीत धाडस टाळावे. चुकीची केलेली खरेदी त्रास वाढवेल.

**कन्या** जोडीदाराच्या अपेक्षा सहजतेने पूर्ण करू शकाल. थोडे मनाजोगते वागण्याकडे कल राहील. तरुण तरूणींना प्रेमप्रकरणात यश संभवते.

**तूळ** काहींना कमी श्रमात अधिक लाभ होण्याचा संभव आहे. मित्रांचे योग्य सहकार्य मिळेल. प्रवास कार्यसाधक व समाधान देणारे ठरतील.

**वृश्चिक** काहींना कमी श्रमात अधिक लाभ संभवतात. कोणावर अवलंबून राहाणे टाळावे. मित्र, नातेवाईकांसाठी पदरमोड करावी लागेल.

**धनु** चारचौघात पतप्रतिष्ठा वाढवणाऱ्या गोष्टी घडतील. संततीशी काही प्रमाणात मतभेद संभवतात. प्रवास कार्यसाधक ठरतील..

**मकर** कौटुंबिक स्तरावर थोडे मुत्सद्दीपणाने निर्णय घेणे गरजेचे आहे. जोडीदाराशी वादविवाद संभवतात. प्रवासात सावधानता बाळगावी.

**कुंभ** संततीचे प्रश्न अडचणी वाढवू शकतात. पैशाच्या व्यवहारातील मध्यस्थी फायदा देईल. उधारी वसूल होईल. कर्ज प्रकरणे यश देतील.

**मीन** प्रसंगी मौन पाळणे फायद्याचे ठरेल. आलेल्या संधीचा अचूक फायदा घेणे गरजेचे आहे. यश अपेक्षेपेक्षा लवकर पदरात पडेल.

# लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी — रवि विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 29 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 17/07/2022

| बक्षिस | क्रमांक | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 100000/- | GL-09 : 4906 | | | | |
| उत्तेजनार्थ बक्षिस रु. 2500/- | 4906 | | | | |
| सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES | | | | | |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3552 | | | | |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1598 बारड लॉटरी सेंटर, सोलापूर (5 बक्षिसे) | 2145 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई (5 बक्षिसे) | 2966 चिराग एन्टरप्रायझेस, नाशिक (5 बक्षिसे) | 4546 | 5587 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 2105 | 3077 | 3874 | 5448 | 5915 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2714 | 2869 | 3587 | 3684 | 5630 |

पाचवे बक्षिस रु. 50/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1391 | 2040 | 2543 | 2838 | 3337 | 3833 | 4290 | 4646 | 5192 | 5653 |
| | 1418 | 2056 | 2562 | 2878 | 3351 | 3836 | 4327 | 4808 | 5264 | 5656 |
| | 1460 | 2066 | 2582 | 2889 | 3373 | 3859 | 4331 | 4818 | 5333 | 5687 |
| 1022 | 1486 | 2072 | 2586 | 2898 | 3384 | 3893 | 4337 | 4840 | 5350 | 5689 |
| 1059 | 1581 | 2080 | 2599 | 2919 | 3398 | 3941 | 4342 | 4844 | 5400 | 5695 |
| 1082 | 1627 | 2184 | 2602 | 2920 | 3481 | 3944 | 4347 | 4848 | 5411 | 5709 |
| 1090 | 1640 | 2207 | 2621 | 2932 | 3494 | 3979 | 4349 | 4849 | 5421 | 5735 |
| 1103 | 1661 | 2208 | 2625 | 2937 | 3547 | 3985 | 4399 | 4899 | 5424 | 5779 |
| 1107 | 1671 | 2222 | 2628 | 2959 | 3557 | 3989 | 4406 | 4904 | 5435 | 5793 |
| 1129 | 1680 | 2238 | 2631 | 2966 | 3563 | 4058 | 4419 | 4917 | 5463 | 5795 |
| 1149 | 1694 | 2243 | 2672 | 2971 | 3567 | 4060 | 4427 | 4920 | 5485 | 5819 |
| 1166 | 1701 | 2250 | 2675 | 2985 | 3630 | 4064 | 4444 | 4922 | 5504 | 5826 |
| 1167 | 1717 | 2264 | 2677 | 3002 | 3667 | 4067 | 4450 | 4935 | 5513 | 5842 |
| 1196 | 1769 | 2272 | 2719 | 3003 | 3682 | 4071 | 4456 | 4946 | 5528 | 5859 |
| 1208 | 1788 | 2277 | 2761 | 3031 | 3687 | 4072 | 4464 | 4979 | 5534 | 5860 |
| 1228 | 1814 | 2284 | 2767 | 3061 | 3689 | 4084 | 4469 | 5007 | 5552 | 5871 |
| 1243 | 1822 | 2286 | 2774 | 3074 | 3743 | 4148 | 4478 | 5012 | 5558 | 5922 |
| 1286 | 1851 | 2295 | 2786 | 3098 | 3760 | 4199 | 4497 | 5054 | 5564 | 5952 |
| 1314 | 1867 | 2298 | 2803 | 3099 | 3767 | 4211 | 4518 | 5057 | 5572 | 5956 |
| 1357 | 1871 | 2305 | 2816 | 3164 | 3769 | 4216 | 4555 | 5071 | 5590 | 5957 |
| 1384 | 1928 | 2319 | 2820 | 3208 | 3773 | 4233 | 4564 | 5085 | 5598 | 5983 |
| 1386 | 1964 | 2344 | 2822 | 3214 | 3806 | 4267 | 4610 | 5117 | 5606 | 5994 |
| 1387 | 2035 | 2508 | 2826 | 3259 | 3831 | 4289 | 4629 | 5190 | 5625 | 5995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि.१८/०७/२०२२

| | | |
|---|---|---|
| ० | ५ | २ |
| ०१ | ५१ | २१ |
| ०६ | ५६ | २६ |
| १९० | ३४८ | ३९० |
| २३५ | १५९ | ११० |

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र मोहिनी — विकली लॉटरी

सोडत सायं. 4:15 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 29 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 17/07/2022

पहिले सामाईक बक्षिस रु. 10000/- — MO-01 : 1961

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 2000/- — 1946, 2071, 2271, 3704 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई (5 बक्षिसे)), 4194 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली (5 बक्षिसे))

| तिसरे बक्षिस रु. 1000/- | चौथे बक्षिस रु. 500/- | पाचवे बक्षिस रु. 400/- |
|---|---|---|
| 1818 | 1067 | 1221 |
| 1936 | 1095 | 1518 |
| 2223 | 1243 | 1564 |
| 2471 | 1454 | 2420 |
| 2598 | 1536 | 2539 |
| 2724 | 1605 | 2589 |
| 2810 | 1776 | 2748 |
| 2859 | 1963 | 3337 |
| 2869 | 2023 | 3516 |
| 3209 | 3980 | 3881 |
| 3253 | 4304 | 4259 |
| 3643 | 4988 | 4476 |
| 4368 | 5335 | 5152 |
| 5520 | 5505 | 5399 |
| 5929 | 5636 | 5511 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — गणेशलक्ष्मी वैभव — विकली लॉटरी

सोडत संध्या. 5:00

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 29 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 17/07/2022

पहिले बक्षिस रु. 10000/- — MG-00 : 1291

सर्व मालिकांसाठी • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | क्रमांक | बक्षिस |
|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 6723 — रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 5000 ची 5 बक्षिसे जिंकली — डायमंड कॉर्पोरेशन - बोरिवली (5 बक्षिसे) |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3257 — रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 2000 ची 5 बक्षिसे जिंकली — अंबिका एजन्सी - दादर, मुंबई (5 बक्षिसे) |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 6940 — रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली | रु 1000 ची 5 बक्षिसे जिंकली — विशेष डिस्ट्रिब्युटर - गोरेगाव (5 बक्षिसे) |

पाचवे बक्षिस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1977 | 2549 | 3346 | 4444 | 5148 | 5788 | 6625 |
| | | 1997 | 2552 | 3742 | 4473 | 5239 | 5967 | 6645 |
| | | 2048 | 2618 | 3889 | 4486 | 5451 | 6087 | 6728 |
| | 1320 | 2117 | 2662 | 3986 | 4494 | 5548 | 6180 | 6861 |
| 1016 | 1410 | 2232 | 2714 | 4027 | 4595 | 5555 | 6186 | 6863 |
| 1109 | 1432 | 2257 | 2777 | 4244 | 4607 | 5702 | 6214 | 6880 |
| 1175 | 1471 | 2259 | 2793 | 4275 | 4747 | 5746 | 6332 | 6881 |
| 1222 | 1810 | 2262 | 3173 | 4416 | 5059 | 5782 | 6537 | 6981 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# अनधिकृत चाळींच्या अर्थकारणाने गरीब जनतेचा बळी!

**वसई पूर्वेला वाघरळ पाडा येथे दरड कोसळून दोन जण मृत्युमुखी पडल्यावर वसईत अनधिकृत चाळी व बांधकामांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. ह्या अनधिकृत बांधकामाची साखळी ज्या रीतीने कार्यरत आहे ते पाहता ह्यात प्रशासन, राजकारणी व माध्यम प्रतिनिधींचेही हात गुंतलेले आहेत ह्या शंकेला बळ मिळते. असे समजण्यात आले आहे की भूमाफिया खासगी अथवा शासकीय जागेत १० बाय १० फुटाचे प्लॉटिंग करतात. यात अनेक बिल्डर सहभागी असतात. साठ चाळीस अशा पद्धतीने भागीदारी ठरली जाते. यात बिल्डरकडून २५ ते ३० हजार रुपये पायाभरणी करून १० बाय १० च्या प्लॉट ऐपतीप्रमाणे घेतले जातात आणि विकसित केले जातात.**



**यात** बिल्डरकडून शासकीय यंत्रणा, पोलीस प्रशासन, स्थानिक नेते आणि माध्यम प्रतिनिधी अशी वेगवेगळी वर्गणी घेतली जाते. त्यानुसार बांधकामे करून ६० टक्के माल बिल्डर तर ४० टक्के माल भूमाफियाला दिला जातो. ह्या चाळी विकण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमांचा वापर केला जातो. अनेक जागी इस्टेट एजंटचे जाळे उभे करतात. कोणतेही अनेक क्षेत्रातील नागरिकांना रोजगार उपलब्ध होतो. यामुळे केवळ एका रात्रीत घरे उभी राहत आहेत. बिनदिक्कत प्रशासनाच्या नावाखाली बांधकामे होत असताना पालिका मात्र केवळ थातूरमातूर कारवाई करून आपली बाजू सांभाळत आहे. पण या बांधकामाची कोणतीही गुणवत्ता व मजबुती नसल्याने वाघराळ लावण्यात प्रशासनाने धन्यता मानली आहे. अशा समस्या सोडविण्यासाठी त्यांनी फारच कमी वेळेला तत्परता दाखविली आहे. ज्या रीतीने वसईत कच्च्या चाळींचे बांधकाम होऊन त्यांना वीज, ह्या अनधिकृत बांधकामांना तत्परतेने उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्यामध्ये वीज मंडळही सहभागी आहे. म्हणून बांधकामांना जोपर्यंत पालिकेची परवानगी मिळत नाही तोपर्यंत तिथे वीज व महानगरपालिकेनेही मे २०१९ ला वीजपुरवठा करणाऱ्या कंपन्यांना एका पत्रकाद्वारे असे सूचित केले आहे की पालिकेच्या अधिकृत परवानगीशिवाय वीजपुरवठा करू नये. अशा व्याज न लावता अडीच हजारांपासून ते ग्राहकाच्या ऐपतीप्रमाणे हप्ता लावून दिला जातो. अशा पद्धतीने या अनधिकृत बांधकामाची साखळी सुरू राहते. अनेक वेळी तक्रार केल्यानंतर केवळ दिखाव्यापूर्ती कारवाई केली जाते.

ह्या साखळीचे दुसरे अंग म्हणजे ही अनधिकृत बांधकामे वर्षभर सुरू असल्याने आणि बहुतांश रोकडीवर चालणारी असल्याने मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे. यात कडिया, मजूर, गवंडी, इलेक्ट्रिशियन, फॅब्रिकेशन, सिमेंट, रेती, खडी, विटा लोखंड, मार्बल, लादी अशा पाडा अशा दुर्घटना समोर येत आहेत. अशा बांधकामांनी अनेकांचे जीव धोक्यात आणले आहेत. ह्या ठिकाणी राहण्यासाठी विशेषतः परप्रांतीय लोकांचा भरणा जास्त असतो. शहराच्या मोठ्या लोकसंख्येला पूरक असे बिनभांडवली धंदे अथवा हलक्या दर्जाची कामे ही लोक करत असतात. त्यांचे उत्पन्नही कमी असते.

विविध माध्यमातून व सामान्य जनतेनेही वसई विरारच्या समस्या महानगर पालिका, तहसीलदार व जिल्हा अधिकाऱ्यांकडे नेहमीच मांडल्या आहेत, पण त्यांना वाटाण्याच्या अक्षता पाणी, गटार अशा मूलभूत सोयी उपलब्ध करून दिल्या जात आहेत ही फार गंभीर बाब आहे असे प्रतिपादन उमेळे येथील सामाजिक कार्यकर्ते दिलीप अनंत राऊत ह्यांनी केले आहे. खरे तर अनधिकृत बांधकामांना

**श्री. दिलीप अनंत राऊत**
उमेळे, वसई. ९८५०८३३८४८

प्रत्येक प्रभाग समितीच्या प्रमुखांना जबाबदार धरले पाहिजे. त्यांच्या डोळ्यादेखत हे सर्व होत असते. जिथे सामान्य नागरिकांना ह्या मूलभूत सोयीसाठी हेलपाटे मारावे लागलात त्या सुविधा पाण्याची सुविधा उपलब्ध करून देऊ नये, असा कायदा महानगरपालिकेने करून तो वीज मंडळ व इतर संस्थांना बंधनकारक केला पाहिजे. अशा बांधकामांना घरपट्टीही लावता कामा नये. याबाबतचा आदेश २१/०८/२०२० रोजी तत्कालीन आयुक्त गंगाधरन डी. ह्यांनी काढला होता व असे असतानाही जे अधिकारी व कर्मचारी अनधिकृत घरपट्टी आकारणी करतील असे निर्देशनास आल्यास संबंधितांवर महाराष्ट्र नागरी १९८३ अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

मीरा भाईंदर बांधकामांना शासनाने रेशन कार्डही देऊ नयेत. शासनाच्या जमिनीवरील अनधिकृत बांधकामांवर वन विभाग, महसूल खाते व तहसील विभाग ह्यांनी पण कारवाई करणे जरुरीचे आहे.

काही दिवसांपूर्वी अशाच एका बांधकामाची जाहिरात समाज माध्यमातून नजरेस पडली ती महानगरपालिकेच्या अनधिकृत बांधकाम विभागाला पाठवून शहानिशा करण्यास कळविले, पण अजूनही त्यांचा प्रतिसाद मिळालेला नाही, असे दिलीप अनंत राऊत ह्यांनी म्हटले आहे.

***

# मंत्र्यांच्या पेन्शन विधेयकाला मंजुरी शासनाला ३० कोटींचा भूर्दंड बसणार

■ अमरावती

मंत्र्यांच्या पेन्शन विधेयकाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारने मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता माजी आमदार आणि मंत्र्यांना दर महिन्याला लाखो रुपयांची पेन्शन मिळणार आहे. मात्र राज्यावर हजारो कोटी रुपयांचे कर्ज असताना आणि विकासकामांसाठी आणखी ६० हजार कोटी रुपये कर्ज घेतले जात असताना माजी मंत्री आणि माजी आमदारांना मात्र विनासायास महिन्याच्या निश्चित तारखेला निवृत्ती वेतन मिळणार आहे.

एव्हढेच नाही तर माजी आमदार आणि मंत्र्यांपैकी किती जण आहेत याची पडताळणी



करून निवृत्ती वेतनाची यादी देखील प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीनुसार, माजी आमदार, माजी कॅबिनेट मंत्री, माजी राज्यमंत्री, विधानसभेचे माजी अध्यक्ष, माजी उपाध्यक्ष, विधान परिषदेचे माजी सभापती, माजी उपसभापती अशा सर्वजणांचा समावेश आहे. यामुळे आता राज्यावर अतिरिक्त बोजा पडण्याची शक्यता असली तरी, आता 'एकदा आमदार आणि आयुष्यभर पगार' असाच काहीसा हा कारभार असल्याचा पुरावाच म्हणावा लागेल. माजी आमदार, मंत्र्यांच्या पेन्शन विधेयकाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिली आहे.

या विधेयकाच्या मंजुरीमुळे शासनाच्या तिजोरीला ३० कोटींचा भूर्दंड सहन करावा लागणार आहे. माजी आमदारांना आयुष्यभर पगार ही नियमावली लागू आहे.दरम्यान, विधानसभेचे माजी आमदार असो वा माजी कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री, विधानसभेचे अध्यक्ष वा उपाध्यक्ष, विधान परिषदेचे सभापती वा उपसभापती, अशा सर्व लोकप्रतिनिधींची यादी प्रसिद्ध करताना शासनाने ते हयात असल्याची पडताळणी केली आहे. त्यानंतर निवृत्ती वेतनाची यादी प्रसिद्ध केल्याची माहिती समोर आली आहे.

# २१७ किमीचे अंतर! ३ पर्वतरांगा पार आशिष कासोदेकरांची यशस्वी मॅरेथॉन

■ वॉशिंग्टन

**पुणेकर** आशिष कासोदेकर यांनी नुकतीच एक अवघड मॅरेथॉन पूर्ण करून भारताच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला. 'ॲडव्हेंचर कॉर्प्स' या संस्थेतर्फे ११ ते १३ जुलैदरम्यान आयोजित करण्यात आलेली मॅरेथॉन त्यांनी ३८ तास २४ मिनिटे आणि २६ सेकंदांत पूर्ण केली. यंदा सहभागी झालेल्या ९४ स्पर्धकांमध्ये ते एकमेव भारतीय स्पर्धक होते. विशेष म्हणजे केवळ ७८ स्पर्धकांनाच ही मॅरेथॉन पूर्ण करता आली. त्यात पहिल्याच प्रयत्नात 'एव्हरेस्ट'वर यशस्वी चढाई करण्याचा विक्रम नावावर असलेल्या कासोदेकर यांनी ४०वा क्रमांक मिळवला.

'बॅडवॉटर १३५' असे या मॅरेथॉनचे नाव असून ती साल १९८७ पासून दरवर्षी उत्तर अमेरिकेत जुलै महिन्याच्या मध्यात आयोजित केली जाते. रात्री आठ वाजता डेथ व्हॅलीतील बॅडवॉटर बेसिनपोपासून ही मॅरेथॉन सुरू होते आणि २१७ किलोमीटरचे अंतर पार करून ती माऊंट व्हिटनी येथे संपते. पाच टप्प्यांमध्ये ती विभागलेली असून स्पर्धकांनी कमाल ४८ तासांमध्ये हे अंतर पूर्ण करणे अपेक्षित असते. दरवर्षी जगभरातील धावपटू या मॅरेथॉनसाठी अर्ज



करतात. मात्र त्यासाठीचे निकष पूर्ण करणाऱ्या धावपटूंनाच यात सहभागी होण्याची संधी मिळते.

दरम्यान, 'मला नवनवीन आव्हाने स्वीकारून ती पूर्ण करायला नेहमीच आवडते', असे म्हणणाऱ्या ५० वर्षीय कासोदेकर यांना सायकलिंग आणि बास्केटबॉलसह विविध मैदानी खेळांची आवड आहे. गेली अनेक वर्षे ते विविध शर्यतींमध्ये भाग घेत आहेत. मॅरेथॉनमधील काही विक्रमही त्यांच्या नावावर आहेत. यंदा वर्षाच्या सुरुवातीला सलग ६१ दिवस ६१ मॅरेथॉन धावण्याचा विश्वविक्रम त्यांनी केला होता. तसेच 'ब्राझील १३५ ट्रेल रन' पूर्ण करणारे ते दुसरे भारतीय आहेत. तर, लडाखमधील 'ला अल्ट्रा मॅरेथॉन' पूर्ण करणारे ते पहिले आणि एकमेव भारतीय आहेत.

# भंडाऱ्यातील एकाच घरात आढळले नाग जातीचे साप

■ भंडारा

**जिल्ह्यातील** तुमसर तालुक्यातील पवनारा येथे विलास रामेश्वर कावळे यांच्या राहत्या घरी नाग जातीचे ११ पिल्ले व एक मादी आढळल्याने एकच खळबळ उडाली. हे दृश्य पाहण्यासाठी एकच गर्दी उसळली होती. यानंतर तातडीने तुमसर येथील सर्पमित्र यांना पाचारण करण्यात आले. त्यांच्या शोधमोहिमेत दीड फूट लांब तीन दिवसांची ११ पिल्ले व ५ फूट लांब मादी साप पकडण्यात यश आले आहे.

सर्व नाग जातीचे विषारी साप असून यात न्यूरोटॉक्झीम विष असल्याचे सर्पमित्रांनी सांगितले. तर, पिल्लांची संख्या जास्त असू शकते, असा अंदाज वर्तवण्यात आला. त्यानुसार घरमालकाला लक्ष ठेवण्याविषयी सांगण्यात आले आहे.

मादी सापाने स्वयंपाक घरात एक खोलगट खड्डा आढळून आल्याने यात अंडे दिल्याचे भाकित करण्यात आले असून ३० ते ३५ अंडी असण्याची शक्यता आहे. दरम्यान, सर्व सापांना वनविभागाच्या कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत निसर्गाच्या सानिध्यात सोडण्यात आले आहे.

# आजपासून संसदेचे अधिवेशन सरकार-विरोधकांत जुंपणार



■ नवी दिल्ली

**उद्यापासून** संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होणार आहे. १८ जुलै ते १२ ऑगस्ट या कालावधीत चालणाऱ्या या अधिवेशनात २४ नवी विधेयके मांडली जाणार आहेत. तर संसदीय समितीकडे असलेली ४ विधेयके सुद्धा याच अधिवेशनात मांडली जाणार आहेत. सरकारकडे दोन्ही सभागृहात पूर्ण बहुमत असल्याने सरकार निर्धास्त आहे तर विरोधकांमध्ये मात्र विविध मुद्यांवर मतभेद असल्याने या अधिवेशनात विरोधकांचीच कसोटी आहे. पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने आज विरोधी पक्षाच्या नेत्यांबरोबर बैठक घेऊन अधिवेशनातील कामकाजाबाबत चर्चा केली. तसेच अधिवेशन सुरळीत चालण्यासाठी सहकार्याची अपेक्षा केली. विरोधकांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे, असे संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी यांनी सांगितले. या पावसाळी अधिवेशनात जी २४ विधेयके मांडली जाणार आहेत.

त्यामध्ये वन संरक्षण विधेयक, ऊर्जा आरक्षण संशोधन विधेयक, कौटुंबिक न्याय संशोधन विधेयक यासारख्या प्रमुख विधेयकाचा समावेश आहे आणि सरकारकडे जरी बहुमत असले तरी या सर्व विधेयकांवर चर्चा करूनच ती मंजूर करण्याची सरकारची भूमिका आहे, असे प्रल्हाद जोशी यांनी सांगितले. दरम्यान या पावसाळी अधिवेशनात संरक्षण दलाची अग्निपथ योजना, नुपूर शर्माच्या वादग्रस्त विधानावरून देशात निर्माण झालेली तणावाची स्थिती आणि त्यातून उदयपूर आणि अमरावतीमध्ये झालेल्या दोन हत्या यावरही अधिवेशनात गदारोळ होण्याची शक्यता आहे. तसेच नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात ईडीकडून सोनिया गांधींना पाठवण्यात आलेले समन्स आणि राहुल गांधींची ७ तास झालेली चौकशी यावरूनही अधिवेशनात गदारोळ होण्याची शक्यता आहे. मात्र विरोधकांमध्ये एकजुटीचा अभाव असल्याने सरकारच्या विरोधात आक्रमक भूमिका घेण्यात त्यांना यश येईल, असे दिसत नाही. त्यामुळे सरकारच्या विरोधात या अधिवेशनात विरोधकांचीच कसोटी लागणार आहे.

# मावळ येथील कुंडमळ्यात पर्यटकांची प्रचंड गर्दी

■ मावळ

**पर्यटन** तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मावळात गेल्या आठवड्यात मोठ्या प्रमाणात मुसळधार पाऊस झाला आहे. या पावसाने मावळातील पर्यटनस्थळे ओसंडून वाहताना दिसते. यामुळे पर्यटन स्थळांवर जाण्यास काही दिवस बंद आहे. तरी देखील कुंडमळ्यात पर्यटकांची मोठी गर्दी झाल्याचे पाहण्यास मिळाले.

मावळमधील टायगर पॉईंट, भुशी डॅम, कुंडमळा ही पर्यटन स्थळे प्रसिद्ध आहे. मात्र मुसळधार पाऊस झाल्याने येथे पर्यटनास बंदी असूनही शेलारवाडीच्या इंद्रायणी नदीवर असलेल्या कुंडमळ्यात पर्यटकांची गर्दी झाली आहे. चार दिवसांपूर्वी याच कुंडमळ्यात मित्रांसोबत आलेली एक मुलगी वाहून गेली होती. तरीही सेल्फी काढणे, पाण्यात पाय सोडून बसणे असे प्रकार इथे घडत आहे. पण पर्यटकांनो आपला जीव अधिक मूल्यवान आहे. जीव धोक्यात घालून सेल्फी काढण्याच्या नादात आपला जीवही जाऊ शकतो.

# खड्ड्यांवरून शिवसेनेचे पालिकेविरोधात उद्या आंदोलन

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेत सत्तेत असलेली शिवसेना आता अंधेरी (पूर्व) मरोळ परिसरात रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांच्या मुद्यावरून चांगलीच आक्रमक झाली आहे. खड्ड्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या पालिका अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यासाठी उद्या मंगळवार १९ जुलै रोजी रस्त्यावर उतरून आंदोलनाचा इशारा दिला आहे. गेल्या आठवड्यात संततधार पावसामुळे मरोळ चर्च, मिलिट्री रोड, कोंडविटा, मरोळ नाका, विजय नगर येथील रस्त्यांची चाळण झाली आहे. पालिकेच्या मेन्टेनन्स विभागाकडे वारंवार तक्रारी करून दुर्लक्ष केले जात आहे, अशी माहिती देऊन शिवसेनेच्या माजी नगरसेविका प्रियांका प्रमोद सावंत पुढे म्हणाल्या, पालिका प्रशासनाच्या ही समस्या निदर्शनास आणून देण्यासाठी आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे.

# पुण्याच्या रक्षकनगरमध्ये आग! १५ घरे जळून खाक

■ पुणे

**हडपसरमधील** रक्षकनगर आणि वैदुवाडीत शनिवारी रात्री उशिरा लागलेल्या भीषण आगीत १५ घरे जळून बेचिराख झाली. सुदैवाने त्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही, अशी माहिती अग्निशमन दलाच्या जवानांनी दिली. पुण्याच्या हडपसर परिसरातील बिराजदार झोपडपट्टीला शनिवारी मध्यरात्री आग लागली. त्यात वैदुवाडी आणि रक्षक नगर येथील १५ घरे जळून बेचिराख झाली. घरातील सर्व सामान आणि वस्तू जळाल्या. वैदूवाडीतील एका घरात मुलीचे लग्न होते. त्यासाठी आणलेले सर्व साहित्य आगीत जळून खाक झाले. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

# दारू प्यायलेल्या पायलटने विमान चक्क महामार्गावरच उतरवले! मद्यपी ताब्यात

■ सेंट लुईस

**अमेरिकेच्या** मध्य भागात असलेल्या मिसुरी राज्यात एक धक्कादायक घटना घडल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. दारू पिऊन विमान उड्डाण केलेल्या पायलटने दारूच्या नशेत आपले विमान चक्क वर्दळ असलेल्या महामार्गावरच उतरवल्याने मोठी खळबळ उडाली. सुदैवाने या विचित्र घटनेत कुणालाही दुखापत झाली नाही. या घटनेनंतर पोलिसांनी या मद्यपी पायलटला ताब्यात घेतले.

विशेष म्हणजे विमानातील अचानकपणे इंधन संपल्याने आपण हा निर्णय घेतल्याचे या पायलटने पोलिसांना सांगितले आहे. ३५ वर्षे वयाचा हा पायलट फ्लोरीडाहून मिसुरीला विमान घेऊन चालला होता. त्याला कॅन्सस सिटीच्या चार्ल्स बी. व्हीलर डाऊनटाऊन येथे उतरायचे होते. हा पायलट भरपूर दारू प्यायलेला होता. त्याच्याजवळ अंमली पदार्थही सापडले आहे. या पायलटने पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास विमान वाहतूक अधिकाऱ्यांना विमानातील इंधन संपल्याचा संदेश पाठवून आपले विमान चक्क महामार्गावरच उतरवले. कारण त्या अधिकाऱ्याने त्याला सांगितले होते की खरेच इंधन संपले असेल तर विमान एखाद्या मोकळ्या जागेत किंवा इतर वाहने नसलेल्या रस्त्यावर उतरा. मात्र दारूच्या नशेत असलेल्या पठ्ठ्याने आपले विमान चक्क वर्दळीच्या महामार्गावर उतरवले. यावेळी विमानाची रेलिंगशी छोटीशी धडक झाली. परंतु त्यात कुठल्याही वाहनाचे नुकसान झाले नाही. मात्र या पायलटला किरकोळ दुखापत झाल्याने त्याला रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांच्या तपासणीत त्याने भरपूर मद्यप्राशन केल्याचे उघड झाले आहे. तसेच त्याच्याकडे अंमली पदार्थ आणि बंदूक सापडली आहे. पोलिसांनी त्याच्यावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# दलित आणि उपेक्षित समाजामध्ये स्वार्थी लोकांची कमतरता नाही

■ लखनऊ

**बहुजन** समाज पक्षाच्या अध्यक्षा आणि उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती यांनी आज एकामागून एक तीन ट्विट करत विरोधकांवर हल्लाबोल केला. त्या

## मायावतींचे ट्विट

ट्विटमध्ये म्हणाल्या की, दलित आणि उपेक्षितांमध्ये स्वार्थी लोकांची कमतरता नाही. यात माझ्या काही नातेवाईकांचाही समावेश असून माझ्या गैरहजेरीत माझ्या दिल्लीतील निवासस्थानावर सीबीआयने छापा टाकल्यानंतर कुटुंबातील काही सदस्य माझ्यापासून दूर गेले. मात्र, लहान भाऊ आनंद मला सोडून गेला नाही. त्याने सरकारी नोकरी सोडून कुटुंबासमवेत माझी सेवा केली आणि पक्षाच्या कामातही तो सक्रिय झाला आहे. या स्वार्थी लोकांनी अनेक प्रकारच्या कागदी संघटना विशेषत: बामसेफ आणि डीएस-४ इत्यादी नावाने तयार केल्या आहेत. ज्या सामाजिक जाणीव निर्माण करण्याच्या नादात आपला स्वार्थ सिद्ध करत आहेत. आता काही लोक बसपामध्ये निष्क्रिय झाले आहेत. ते दुसऱ्या मार्गाने आपला स्वार्थ साधत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली आहे. तर तिसऱ्या ट्विटमध्ये त्यांनी म्हटले की, अशा प्रकारे जातीयवादी शक्ती बसपाला कमकुवत करण्यासाठी पडद्याआडून कारस्थान करत आहेत. कागदी पक्ष बनवून निवडणुकीत दलित आणि शोषितांच्या मतांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करतात, पक्षाच्या हिताच्या दृष्टीने सर्वांनी सावध राहण्याचे आवाहनही मायावतींनी केले.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# वर्षासहलीला जाताना अतिउत्साह नको

सध्या राज्यात बऱ्याच ठिकाणी पावसाचे धूमशान सुरू आहे. गेल्या पंधरा दिवसांपासूनचा पावसाचा हा अवतार एकूणच डोंगरदऱ्यांना हिरवीगार नवी दुलई बहाल करतो आहे. आणि अपेक्षेप्रमाणे सगळ्या पर्यटन स्थळांवर पर्यटकांची तुफान गर्दी होते आहे. ज्याला वर्षासहलींचा कालावधी म्हणतात. तो सुरू झालेला आहे. गेल्या आठ दिवसातली वेगवेगळ्या निसर्गरम्य स्थळांवरची पर्यटकांची गर्दी बघितल्यानंतर लोकांचा उत्साह लक्षात येतो. मात्र याच आठ दिवसात पर्यटनासाठी गेलेले किंवा वर्षासहलीसाठी गेलेल्यांच्या काही दुर्घटनाही घडल्या. विशेषतः वाहनांना अपघात होण्याचे प्रकार त्यात जास्त आहेत. शिवाय पाण्यामध्ये उतरताना अंदाज न आल्याने मृत्युमुखी पडलेल्यांची संख्यादेखील लक्षात घेण्यासारखी आहे. म्हणूनच वर्षासहलीला जाताना अतिउत्साह किती धोकादायक असू शकतो हेही ठळकपणाने लक्षात येते. गेले दोन वर्ष कोरोनामुळे लोकांना फारसे बाहेर पडता आले नाही. स्वाभाविकपणे यावर्षी पूर्णपणे मोकळे वातावरण असल्याने वर्षासहलीला जाणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय असू शकते. अगदी यंदा पंढरपूरच्या वारीला जाणाऱ्यांच्या संख्येतही जवळपास दुप्पट वाढ झाल्याचे सांगितले गेले. म्हणूनच हा सगळा उत्साह आणि त्यातून उद्भवणाऱ्या समस्या याचादेखील तितक्याच गांभीर्याने विचार झाला पाहिजे. गेल्या पंधरा दिवसात जी जी काही महत्त्वाची पर्यटन स्थळं आहेत तिथे भरपूर पाऊस झाला. लोणावळा, खंडाळा, महाबळेश्वर किंवा वेगवेगळ्या धबधब्यांच्या येथे जाऊन अनेकांनी मनसोक्त आनंद लुटला. परंतु एकूणच पावसाचा आणि केव्हाही कोणतीही परिस्थिती उद्भवू शकते याचा अंदाज नसल्याने सुरक्षा यंत्रणांना खूपच सतर्क राहावे लागते आहे. लोणावळा, खंडाळा भागात तर पोलिसांना १४४ कलम लागू करण्याची वेळ आली होती. कारण मुंबई आणि पुण्याच्या मध्यवर्ती असलेल्या लोणावळ्याच्या निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेणाऱ्यांची संख्या यावर्षी इतकी वाढली की त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे अक्षरशः पोलिसांच्या हाताबाहेर गेले होते. एकीकडे धो धो कोसळणारा पाऊस आणि दुसरीकडे दरडी कोसळण्याचे किंवा महामार्गावर माती घसरून येण्याचे प्रकार घडले.

### बेभरोशाचा पाऊस

निसर्गाचा एक वैशिष्ट्यपूर्ण चमत्कार म्हणजे आषाढ आणि श्रावण महिने असतात. आणि या दोन महिन्यातच खऱ्या अर्थाने डोंगरदऱ्यांमधले किंवा थंड हवेच्या ठिकाणांवर गर्दी होणे स्वाभाविक ठरते. कोरोनाच्या काळात कुठेही हलता न आल्याने लोक बाहेर पडण्यासाठी खूप उत्सुक आहेत. तो सगळा अनुशेष या पावसाळ्यामध्ये भरून निघतो आहे की काय इतकी गर्दी सगळीकडे पाहायला मिळते. मात्र पावसाचे एकूण स्वरूप पाहिल्यानंतर केव्हा आणि कुठे कशा प्रकारची आपत्ती निर्माण होईल याचादेखील अंदाज देता येत नाही. म्हणजे जी दरवर्षीची हमखास अशी वर्षासहलींची ठिकाणे आहेत. जिथे आतापर्यंत पर्यटक बिनदिक्कतपणे जात होते. आणि वर्षासहलीचा आनंदही घेत होते. मात्र यावर्षी त्यातल्या बऱ्याच ठिकाणी पावसाचे प्रमाण अपेक्षेपेक्षा जास्त राहिले. म्हणजे अगदी त्याचे प्रातिनिधीक उदाहरण द्यायचे झाले तर मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांमध्ये केवळ आठ दिवसात प्रचंड पाणीसाठा जमा झाला. म्हणजे पंधरा दिवसांपूर्वी मुंबईत दहा टक्के पाणीकपात करावी लागली होती. तर आता मात्र मुंबईला सहा महिने पुरेल इतका पाणीसाठी तयार झालेला आहे. यावरून पावसाचे प्रमाण अचानकपणे किती वाढले आहे याचा अंदाज येतो. तीच परिस्थिती गडचिरोली, विदर्भातली अनेक ठिकाणे, मराठवाड्यात गोदावरीची किनारपट्टी तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये कृष्णा, पवना, कोयना, आणि पंचगंगा या नद्यांची स्थिती अशाच प्रकारची होती. या सर्व भागातल्या पर्यटन ठिकाणीसुद्धा अपेक्षेपेक्षा जास्त पाऊस झाला. धक्कादायक गोष्ट अशी आहे की केवळ महिन्याभरामध्ये वीज कोसळण्याच्या घटना घडल्या आणि त्यात राज्यभरात पन्नास लोकांचा बळी गेला. शिवाय वेगवेगळ्या अपघातांमध्ये मृत्युमुखी पडलेल्यांची संख्याही दहा ते पंधरापर्यंत असल्याचे सांगितले जाते. याचा स्पष्ट अर्थ असा होतो की वर्षासहलीला जाताना किंवा वर्षापर्यटनासाठी बाहेर पडताना पुरेशी काळजी, खबरदारी किंवा एकूण परिस्थितीचा अंदाज घेऊनच बाहेर पडणे योग्य ठरेल.

### तथाकथित गटारी बाकी

विविध प्रसारमाध्यमांमधूनसुद्धा या वर्षापर्यटनाचे कोडकौतुक पाहायला मिळते. अनेक कंपन्या, हॉटेल, रिसॉर्ट यांच्याकडून अशा पर्यटनासाठी ऑफर्स दिल्या जातात. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळे फंडे वापरले जात आहेत. केवळ त्याला बळी न पडता सारासार विचार करूनच पर्यटनाचा आनंद घेतला गेला पाहिजे. सध्या एकूणच हवामान किंवा पर्जन्यमान यातला बेभरोसा जास्त वाढल्याचे पाहायला मिळते. जिथे सर्व आधुनिक साधनसामुग्री असलेल्या वेधशाळांनाही त्या पावसाचा अंदाज येत नाही. तिथे सामान्य माणसाने आपला जीव किती धोक्यात घालायचा याचा विचार केला पाहिजे. म्हणूनच वर्षासहलीचे आकर्षण आणि लोकांमधला अतिउत्साह या गोष्टींचे नीट आकलन होणे गरजेचे आहे. आणखी आठ दहा दिवसांनी गटारी अमावस्येची एक वेगळीच विकृती पाहायला मिळू शकते. ज्याला आपण दीप अमावस्या म्हणतो त्या दिवसाला गटारी संबोधून केल्या जाणाऱ्या पार्ट्या आणि आज पर्यटन ठिकाणांवर होणारी व्यसनाधीन भुणग्यांची गर्दी म्हणजे पोलिसांसाठी सर्वात मोठी डोकेदुखी असते. हाच मुद्दा सर्वांनीच लक्षात घेतला पाहिजे की स्वतःच्या आनंदासाठी आयोजित केली जाणारी वर्षासहल किंवा पर्यटन सुरक्षा यंत्रणांसाठी कसोटी पाहणारे ठरता कामा नये. यंदाच्या पावसाळ्यातला खऱ्या अर्थाने मोठा पाऊस गेल्या आठ दिवसात झाला. परंतु त्याचवेळी अनेक ठिकाणी आलेले महापूर आणि त्यात गाड्या वाहून जाण्याचे प्रकार घडले त्यातला चौघांचा झालेला मृत्यू आणखीनच वेदनादायक ठरतो. अजून पुढच्या महिन्या दीड महिन्यामध्ये पावसाचे प्रमाण वाढू शकते. या सगळ्या परिस्थितीचा अंदाज घेऊनच वर्षासहलींसाठी उत्साह दाखवला गेला पाहिजे.

## सुविचार

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

ग्रंथ समजल्याशिवाय संत समजणार नाही आणि संत समजल्याशिवाय भगवंत समजणार नाही.

## पंचांग

सोमवार १८ जुलै, २०२२
शक १९४४ शुभकृत्‌नामसंवत्सर

आषाढ कृष्ण पंचमी * नक्षत्र : पूर्वा भाद्रपदा



रवी उदय- ०६-१२
रवी अस्त- १९-१८

-: जन्मराशी :-
००-०१ ते ०६-३३ कुंभ
०६-३४ ते २४-०० मीन

सरखेल कान्होजी आंग्रे पुण्यतिथी,
लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मृतिदिन

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क - जाहिरात विभाग : ८९०८११६४२३, ८९०८११६४२९,
वितरण विभाग : ९५९४९३६४४१ छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५.
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

## कविता...

### पावसाची गाणी...



रिमझिम पावसाची गाणी
धरती ऐकू लागली
झाडांमधल्या झोक्यामधूनी
कळी फुलूनी आली...

माती मधूनी गंध दरवळला
आसमंतात फुलूनी गेला
वाऱ्यासोबत कधी खेळताना
फेर धरूनी आला...

पक्ष्यांचा चिवचिवाट आता
पावसात भिजुनी गेला
पानांवरल्या दवबिंदूचा
थेंब फुलूनी आला...

वाटते कधी तरी थेंबांना
गीत पावसाचे गावे
मंत्रमुग्ध डोलत राहून
पावसाचा स्वागताला यावे...

● दिलीप नामदेव धायगुडे ●
माहीम, मुंबई. मोबा ७७३८०३९१९५



# राष्ट्रकुलसाठी भारताच्या २१५ खेळाडूंचे पथक

# सिंधू, प्रणय, नीरजकडून पदकांची अपेक्षा

**येत्या २८ जुलै पासून इंग्लंड मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धेसाठी भारताच्या २१५ खेळाडूंच्या पथकाची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये सिंगापूर ओपन विजेती पीव्ही सिंधू हिच्यासह ऑलिम्पिक सुवर्ण पदक विजेता नीरज चोप्रा महिला वेटलिफ्टर मीराबाई चानू, मनीष बात्रा, विनेश फोगट यांच्यासारख्या प्रसिद्ध खेळाडूंचा समावेश आहे.**



■ नवी दिल्ली

**इंग्लंडच्या** बर्मिंगहॅममध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धे साठी २१५ खेळाडूंच्या पथकाबरोबर १०७ अधिकारी आणि सहाय्यक कर्मचारी सुद्धा असतील. राष्ट्रकुल स्पर्धेतील भारताची आजवरची कामगिरी खूप चांगली आहे. मागील राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्ण पदकाच्या बाबतीत ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडच्या पाठोपाठ भारत तिसऱ्या क्रमांकावर होता. यावेळी आमचे खेळाडू आणखी चांगली कामगिरी करतील, असा विश्वास आयओएचे महासचिव राजीव मेहता यांनी सांगितले. दरम्यान या स्पर्धेत १५ खेळांचा समावेश आहे. ज्यात बॉक्सिंग, बॅडमिंटन, हॉकी, वेटलिफ्टिंग, कुस्ती आणि महिला क्रिकेटचाही समावेश आहे. राष्ट्रकुल स्पर्धेत प्रथमच टी २२ क्रिकेटचा समावेश करण्यात आलेला आहे. आणि सध्या तरी भारत क्रिकेटमध्ये आशिया खंडात अव्वल आहे. त्यामुळे क्रिकेटमध्ये भारताला मोठ्या अपेक्षा आहेत. मात्र हॉकीमध्ये भारताला कडवे आव्हान आहे. तरीही भारताचा पुरुष आणि महिला हॉकी संघ मजबूत आहे. सिंधू आणि नीरज चोप्रासह अनेक स्टार खेळाडू भारतीय पथकात आहेत. त्यामुळेच यंदा भारतीय खेळाडूंकडून राष्ट्रकुल स्पर्धेत मोठी अपेक्षा आहे. भारतीय खेळाडूंची बर्मिंगहॅममध्ये पाच वेगवेगळ्या ठिकाणी राहण्याची व्यवस्था असेल. आणि २३ तारखेपासून जगभरातील सर्व खेळाडूंना राष्ट्रकुल स्पोर्ट्स व्हिलेजचे दरवाजे उघडतील. भारताने नेमबाजीत चांगली कामगिरी केलेली आहे, पण यावेळी नेमबाजीच्या या स्पर्धेतून वगळण्यात आल्याने भारतीय नेमबाजांची इंग्लंड वारी हुकली आहे.

# विश्व ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत भारत सातव्या क्रमांकावर



■ नवी दिल्ली

**विश्व** ॲथलेटिक्स चॅंपियनशिपच्या अंतिम फेरीत भारताचा लॉन्ग जंपर मुरली श्रीशंकर याने निराशा केली आहे. तो सातव्या केमांकावर फेकला गेला. चीनच्या जिनांनवांग याने या स्पर्धेचे सुवर्णपदक जिंकले. तर ग्रीसच्या टेंटोंगलू याला रजत पदकावर समाधान मानावे लागले. भारताच्या मुरली श्रीशंकर याची विश्व् अथेलेटिक्स स्पर्धेतील सुरुवातीची कामगिरी चांगली होती. त्याने पात्रता फेरीत ८ मीटरचे अंतर सहज पार करून अंतिम फेरीत प्रवेश केला होता. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश करणारा तो पहिला भारतीय होता त्यामुळे त्याच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या. पण त्याने अंतिम फेरीत निराशा केली.

अंतिम फेरीत त ७.९६ मीटर इतकीच लांब उडी तो घेऊ शकला. त्यामुळे तो सातव्या क्रमांकावर फेकला गेला. त्याचा पूर्वीचा रेकॉर्ड ८. ३६ मीटरचा होता. पण अंतिम फेरीत त्याला निराशा आली. तर या स्पर्धेचे सुवर्णपदक जिंकणारा जिनांन वांग याने ८. ३६ मीटर इतकी लांब उडी घेतली. ग्रीसचा तेंतेंग्लू याने ८.३० मीटर लांब उडी घेऊन रजत पदक जिंकले. ८. १६ मीटर उडी घेणारा स्वीटरजलँड्चा सिमॉन हॅमर याने कांस्य पदक जिंकले आहे. या स्पर्धेत भारताच्या महिला खेळाडूंचेही निराशजनक प्रदर्शन होते ३ हजार मीटर स्तीपलचेज मध्ये भारताची पारुल चौधरी बाराव्या स्तनावर फेकली गेली. तर इतर खेळाडूंनाही या स्पर्धेत अपयश आले.

# बांगला देशच्या तमिम इकबालचा टी-२० क्रिकेटला अलविदा

■ ढाका

**बांगला** देशचा स्टार फलंदाज तमिम इकबाल याने टी २० क्रिकेटमधून संन्यास घेतला आहे. आज त्याने आपल्या फेसबुक पेजवरून ही माहिती दिली. 'आज से मुझे टी २० इंटरनॅशनल क्रिकेटस रिटायर समझे' अशा एका ओळीच्या पोस्टमधून त्याने टी २० मधून निवृत्तीची घोषणा केली.

तमाम इकबाल हा बांगला देशचा सलामीचा फलंदाज आहे. मात्र ९ मार्च २०२० पासून तो टी २० पासून दूर होता. मीरपूर येथे झिम्बाब्वे बरोबर तो शेवटचा टी २० सामना खेळला होता. तमिम बांगला देशकडून ७८ टी २० सामने खेळलेला आहे आणि त्यात त्याने २४.०८ च्या सरासरीने १७५८ धावा केलेल्या आहेत. त्यात एका शतकाचाही समावेश आहे. नुकत्याच संपलेल्या वेस्ट इंडिज बरोबरच्या टी २० आणि एकदिवशीय सामन्यांच्या मालिकेतही तो खेळलेला होता. मात्र त्यात त्याला फारशी चमकदार कामगिरी करता आली नव्हती. तमिमने त्याच्या क्रिकेट कारकिर्दीत ६९ कसोटी आणि २२८ एकदिवशीय सामने खेळला आहे. एकदिवशीय सामन्यात त्याने ३६.९४ च्या सरासरीने ७९८३ धावा केलेल्या आहेत. त्यात १४ शतकांचा समावेश आहे. तर कसोटी सामन्यांमध्ये त्याच्या ५०८२ धावा असून त्यात १० शतक आहेत.

# राष्ट्रकुलमधून वगळल्याने सायनाला अश्रू अनावर

■ नवी दिल्ली



**भारताची** स्टार बॅडमिंटनपटू सायना नेहवाल हिची राष्ट्रकुल स्पर्धेसाठी निवड होऊ शकली नाही. त्यामुळे निराश झालेल्या सायनाला अश्रू अनावर झाले होते. ती सतत दोन दिवस रडत होती, अशी माहिती सायनाचे पती पारुपल्ली कश्यप यांनी दिली. भारतात बॅडमिंटनला नवी ओळख देण्यात सायनाचे मोठे योगदान आहे. तिने अनेक मोठ्या स्पर्धांमध्ये भारताला सुवर्ण आणि रजत पदक मिळवून दिलेली आहेत. २०१० आणि २०१८ च्या राष्ट्रकुल स्पर्धेतही तिने भारताला पदक मिळवून दिलीत, असे असताना यंदा केवळ खराब फॉर्ममुळे तिला वगळण्यात आल्याचे कारण दिले जात आहे. हे काही योग्य नाही, असेही कश्यप यांनी सांगितले.

# बार्सिलोनाकडून खेळणार लेवोन्डोस्की

■ पॅरिस

**स्पॅनिश** फुटबॉल क्लब बार्सिलोनाच्या फॅन्ससाठी एक आनंदाची बातमी आहे. स्टार फुटबॉल खेळाडू रॉबर्ट लेवान्डोस्की हा पुढच्या सिजनमध्ये बार्स कडून खेळणार आहे. बर्या म्युनिख मधून तो बाहेर पडला आहे. दोन दिवसांपूर्वीच याबाबतची डील पूर्ण झाली.बर्या म्युनिखचे अध्यक्ष हार्बट हॅनार यांनी त्यांच्या ट्विटर अकाउंटवर या बाबतची माहिती दिली .ते म्हणाले की, रॉबर्ट एक स्टार खेळाडू आहे आणि आमच्यासाठी त्याने अनेक सामने जिंकून दिले आहेत.

# श्रीलंकेतील आशिया कप स्पर्धेवर संकट

■ कोलंबो

**येत्या** २६ ऑगस्ट पासून श्रीलंकेत आशिया कप क्रिकेट स्पर्धा होणार होती. पण तिथली सध्याची परिस्थिती पाहता या स्पर्धेचे आयोजन श्रीलंकेत करणे धोक्याचे आहे. त्यामुळे ही स्पर्धा आता दुसऱ्या देशात खेळवली जाणार आहे.

टी २० विश्वचषक स्पर्धेपूर्वी होणारी आशिया चषक स्पर्धा ही खेळाडूंच्या तयारीसाठी महत्वाची मानली जाते. या स्पर्धेचे वेळापत्रक अगोदरच ठरलेले होते, पण सध्या श्रीलंकेतील स्थिती भयंकर आहे. तिथल्या जनतेने सरकारच्या विरोधात उठाव केलाय. जाळपोळ आणि तोडफोड सुरू आहे. लोकांनी राष्ट्रपती निवासस्थानाचाही ताबा घेतलाय. अशा परिस्थितीत आशिया कप स्पर्धा श्रीलंकेत खेळवणे खेळाडूंच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही धोकादायक आहे. त्यामुळे आता आशियायी क्रिकेट परिषद या स्पर्धेचे ठिकाण बदलणार आहे. ही स्पर्धा आता सिंगापूर कुवेत हॉंकॉंग किंवा युएइ या देशांमध्ये होऊ शकते. मात्र अजून याबाबतची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. या स्पर्धेत खेळणाऱ्या सर्व देशांच्या क्रिकेट बोर्डांशी चर्चा करूनच या स्पर्धेचे ठिकाण निश्चित केले जाणार आहे. सध्याची परिस्थिती पाहता ही स्पर्धा श्रीलंकेत होणार नाही हे निश्चित! त्यामुळे ही स्पर्धा कुठल्या देशात होणार याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# ३१ जुलैला भारत-पाकिस्तान संघ भिडणार

■ नवी दिल्ली



**राष्ट्रकुल** स्पर्धेत यंदा प्रथमच क्रिकेटला समाविष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे या स्पर्धेची रंगत वाढणार आहे. ८ देशाच्या महिला क्रिकेट संघांना दोन गटात विभागण्यात आले आहे. भारत आणि पाकिस्तान एकाच गटात असल्याने ३१ जुलै रोजी या दोन पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये लढत होणार आहे.

या स्पर्धेत महिला क्रिकेटचे सामने या स्पर्धेचे आकर्षण ठरणार आहेत. त्यासाठी ए आणि बी असे दोन गट करण्यात आले आहेत. ए गटात भारत, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया आणि बार्बाडोस या चार संघांचा समावेश आहे. तर बी गटात इंग्लंड, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका आणि श्रीलंका यांचा समावेश आहे. भारत-पाक सामन्यात हरमनप्रीत कौर ही भारताचे नेतृत्व करील तर बिस्माह मारुफा हिच्या हाती पाकिस्तानी संघाची कमान असेल. काही महिन्यांपूर्वीच झालेल्या महिला विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला संघाची कामगिरी खूपच चांगली झाली होती. इंग्लंडकडून निसटता पराभव झाला नसता तर भारत सहजपणे उपांत्य फेरीत पोहोचणार होता. याउलट पाकिस्तानची अवस्था खूपच वाईट होती. बांगला देशने सुद्धा पाकिस्तानला हरवले होते. त्यामुळे गुणतालिकेत पाकिस्तानी संघ शेवटच्या क्रमांकावर फेकला गेला होता. त्यामुळे ३१ जुलैच्या लढतीत भारत सहजपणे पाकिस्तानला पराभूत करील, असा विश्वास भारतीय चाहत्यांना आहे. या लढतीकडे दोन्ही देशातील क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागलेले आहे.

# भीमा, आष्टी व जकराया कारखान्यांनी एफआरपी रक्कम शेतकऱ्यांना त्वरित द्यावी

■ मोहोळ

**मोहोळ** तालुक्यातील मौजे आष्टी येथील आष्टी शुगर कारखान्याने व टाकळी सिकंदर येथील भीमा सहकारी साखर कारखान्याने मार्च एप्रिलमधील राहिलेली उसाची एफआरपीची रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्याप जमा केलेले नाही. तसेच अनगर येथील लोकनेते व वटवटे येथील जकराया साखर कारखान्याने २०२१-२२ ची राहिलेली एफआरपीतील रक्कम, फरक त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा या मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर भैय्या देशमुख यांच्या नेतृत्वाखाली साखर सहसंचालक यांचे कार्यालयामध्ये दिले.

भीमा कारखान्याने चार ते पाच वर्षांपूर्वीचे वाढीव मधील राहिलेले शंभर रुपये द्यावे. तसेच भीमा कारखान्यातील कामगारांचा १८



महिन्यांचा पगार व ३६ महिन्यांचा पीएफ त्वरित कामगार आयुक्त कार्यालयाच्या खात्यावर जमा करावा. तसेच हंगामी कामगारांचे २०१८ पासून चे रिटेशनचे थकित पेमेंट त्यांच्या खात्यावर जमा करावे. निवृत्त कामगारांचे २०१७-१८ पासूनचे फायनल पेमेंट त्वरित त्यांच्या खात्यावर जमा करावे. तसेच पत्रकारांशी बोलताना प्रभाकर देशमुख म्हणाले, आष्टी शुगर कारखाना हा शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या जीवावर चालतो. परंतु त्या कारखान्याने अद्याप शेतकरी व कामगारांना एक चिमूटभर साखर दिलेली नाही ही दुर्दैवाची बाब आहे याचा विचार आष्टी शुगरचे चेअरमन तथा भाजपाचे राज्याचे नेते हर्षवर्धन पाटील यांनी करावा. शेतकऱ्यांचा फरक त्यांच्या खात्यावर जमा करावा या मागण्यांसाठी मोहोळ तहसील कार्यालयासमोर २१ जुलै रोजी गुरुवारी बारा ते सहा या वेळेत बोंबा आंदोलन करून जाब विचारणार असल्याचे देशमुख यांनी सांगितले.

# सोलापूरमध्ये रिक्षा दरात वाढ प्रवाशांच्या खिशाला लागली कात्री

■ सोलापूर

**सोलापूरमध्ये** आता रिक्षातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना पहिल्या दीड किलोमीटरसाठी २३ रुपये आणि त्यापुढील प्रत्येक एक किलोमीटरसाठी १५ रुपये मोजावे लागणार आहेत. सोलापूर आरटीओ कार्यालयाने हा भाडेवाढीचा निर्णय घेतला असून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी त्यास शनिवारी मान्यता दिली. सोमवारपासून ही भाडेवाढ लागू होणार आहे.

यापूर्वी, साधारणतः २०१२ मध्ये येथे रिक्षांचे भाडे वाढवले होते. त्यावेळी ५५ ते ६० रुपये प्रतिलिटर डिझेलचा दर होता आणि सध्या डिझेल १०० रुपयांवर पोहोचले आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे, सहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय तिराणकर यांच्या बैठकीत भाडेवाढीचा निर्णय झाला. दरम्यान, ऑटोरिक्षांमधील मीटरचे पुन्हा प्रमाणीकरण केले जाणार आहे. त्यासाठी ९० दिवसांची मुदत देण्यात आली आहे. मुदतीत हे काम करून न घेतल्यास कमीत कमी सात दिवस ते जास्तीत जास्त ४० दिवसांसाठी त्या रिक्षाचा परवाना निलंबित होईल, असा इशारा आरटीओ अधिकाऱ्यांनी दिला आहे.

# सातारा तालुक्यातील वीर जवान समाधान मोहितेंचे अपघाती निधन

■ सातारा

**आपल्या** चुलत बहिणीची लग्नपत्रिका पाहुण्यांना वाटण्यासाठी म्हसवडमार्गे दुचाकीवरून जात असताना दुचाकी घसरून झालेल्या भीषण अपघात वीर जवान समाधान मानाजी मोहिते यांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना पांढरवाडी येथे घडली. ते ३१ वर्षांचे होते.सातारा तालुक्यातील जाधववाडी-तासगावचे सुपुत्र जवान समाधान मोहिते यांच्या अशा या मृत्यूमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. काल शनिवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

वीर जवान समाधान मोहिते यांच्या पश्चात आईवडील, पत्नी, मोठा भाऊ, आणि दोन लहान मुले असा परिवार आहे. चुलत बहिणीची लग्नपत्रिका वाटण्यासाठी ते दुचाकीवरून म्हसवडमार्गे चालले होते. त्यावेळी त्यांची दुचाकी पांढरवाडी येथे येताच रस्त्यावरून घसरली. यात डोक्याला जबर मार लागल्याने समाधान यांचा जागीच मृत्यू झाला. काल दुपारी त्यांचे पार्थिव गावात आणल्यानंतर त्यांची फुलांनी सजवलेल्या गाडीतून अंत्ययात्रा काढण्यात आली. यावेळी 'भारत माता की जय' च्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला होता. लष्करी जवानांनी हवेत बंदुकीच्या फैरी झाडून त्यांना मानवंदना दिली. त्यानंतर त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शिवसेनेचा शिंदे गटाला धक्का यवतमाळचे पदाधिकारी बदलले

■ यवतमाळ

**शिवसेनेत** उभी फूट पडल्यानंतर दररोज शिवसेनेला बंडखोर नेते मंडळी धक्के देत आहे. मात्र यवतमाळ जिल्ह्यातील खासकरून बंडखोर शिवसेनेचे आमदार संजय राठोड यांच्या मतदारसंघातील दारव्हा, दिग्रस आणि नेर या तीन तालुक्यातील सर्वच पदाधिकाऱ्यांना बाजूला करून त्यांच्या जागी नव्याने पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केल्याची माहिती शिवसेनेने जाहीर केली आहे.

जिल्ह्यातील शिवसेनेचे एकमेव आमदार संजय राठोड यांनी बंड करत शिंदे गटात सामील झाले. त्यानंतर खासदार भावना गवळींनी देखील बंड केलं. त्यामुळे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दोन दिवसाआधी शिवसेना भवन मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील सर्व आजी-माजी पदाधिकाऱ्यांसोबत संवाद साधला. यात प्रामुख्याने जिल्ह्यातील सेनेचे पहिले आमदार श्रीकांत ऊर्फ बाळासाहेब मुनगिनवार यांची सहसंपर्क प्रमुखपदी नियुक्त करून आमदार संजय राठोड आणि खासदार भावना गवळींना धक्का देण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# मुख्यमंत्री मान यांच्या घराजवळ ३ आंदोलकांचा आत्महत्येचा प्रयत्न

■ चंदिगड

**पंजाब** पोलीस दलात भरती सुरू करावी या मागणीसाठी एक महिन्यापासून आंदोलन करणारे तरुण आता आणखी आक्रमक झाले आहेत. मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या संगरूर येथील घराजवळ ३ आंदोलकांनी आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत, अशी माहिती आंदोलन करणाऱ्या संघटनेचे अध्यक्ष जगदीप सिंग यांनी दिली.

पंजाब पोलीस दलातील २०१६ आणि २०१७ च्या भरती प्रक्रियेप्रमाणे नोकरी मिळावी यासाठी पंजाबमधील तरुणांनी

**पोलीस भरतीवरून तरुण आक्रमक**

आंदोलन सुरू केले आहे. १० मेपासून मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या घराबाहेर ते आंदोलन करत आहेत. लोकसभा पोटनिवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री भगवंत मान यांनी जुलैच्या पहिल्या आठवड्यात तुमचा प्रश्न सोडवला जाईल, असे आश्वासन आंदोलक तरुणांना दिले होते. मात्र त्यांनी ते पाळले नाही. त्यामुळे नाराज आंदोलकांनी आक्रमक आंदोलन सुरू केले आहे. त्यात शुक्रवारी रात्री २ आंदोलक तरुणांनी आत्महत्येचा प्रयत्न केला तर शनिवारी रात्री आणखी एका तरुणाने आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत, असे आंदोलकांच्या संघटनेने सांगितले.

# मुंबईतील रेल्वे स्थानकांत २१ ठिकाणी सापडल्या मलेरिया डासांच्या अळ्या

■ मुंबई

**कोरोनाने** पुन्हा एकदा डोकं वर काढले आहे. त्यात मलेरिया, डेंग्यू सारखी पावसाळी आजारपणही नागरिकांसमोर नवी चिंता निर्माण झाली असताना प्रचंड गर्दीच्या दादर स्थानकासह माहीम, माटुंगा आणि शीव स्थानकाच्या छपरावरील पन्हाळींमध्ये साचलेल्या पाण्यात तब्बल २१ ठिकाणी मलेरियाच्या अँनोफिलीस डासाच्या अळ्या सापडल्या असल्याची माहिती समोर आली आहे.

त्यामुळे पालिकेकडून डास प्रतिबंधक फवारणी आणि डासांची ठिकाणे नष्ट करण्यास सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती जी/उत्तरचे सहायक आयुक्त प्रशांत सकपाळे यांनी सांगितली. या पार्श्वभूमीवर महापालिकेने ठिकठिकाणी डासांच्या अळ्यांची



शोधमोहीम सुरू केली आहे. जुलै महिन्याच्या सुरुवातीपासून मुंबईत जोरदार पावसाला सुरुवात झाल्यामुळे पाणी साचून पावसाळी आजार वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशावेळी मुंबईतील गर्दीच्या ठिकाणी दादर स्थानकासह माहीम, माटुंगा आणि शीव स्थानकाच्या छपरावरील पन्हाळींमध्ये साचलेल्या पाण्यात तब्बल २१ ठिकाणी मलेरियाच्या अँनोफिलीस डासाच्या अळ्या सापडल्या असल्या तरी इतर रेल्वे स्थानकांच्या शेडवरही अळ्या असण्याची शक्यता लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने खबरदारी घेण्याचे आवाहन पालिकेने केले आहे. इमारत परिसरातील पाण्याच्या टाक्या, गच्चीवर टाकलेले अडगळीचे सामान, झोपडपट्टीमधील पाण्याचे ड्रम, प्लास्टिक ताडपत्रीमध्ये साचलेले पावसाचे पाणी, भंगार वस्तू, बांधकामे आदींची तपासणी करण्यात येत आहे.

# पुण्यात थंडीने शेळ्यांचा मृत्यू

■ पुणे

**निसर्गाच्या** प्रकोपाचा मुक्या प्राण्यांना सर्वाधिक फटका बसतो नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे आंबेगाव तालुक्याच्या आदिवासी भागातील अनेक शेळ्या मेंढ्याचा थंडीने गारठून मृत्यू झाला . आता मेंढपाळांनी सरकारकडे नुकसान भरपाईची मागणी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात जो मुसळधार पाऊस पडतोय. त्यामुळे गुरेढोरे पुराच्या पाण्यात वाहून गेली. तर काही चाऱ्या अभावी मृत्युमुखी पडली . आंबेगाव तालुक्यातही मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली. त्यामुळे गुरे तसेच शेळ्यांना चारा मिळत नव्हता. त्यातच पावसामुळे कडाक्याची थंडी पडली होती आणि याच थंडीत गारठून आदिवासी पाड्यावरच्या मेंढपाळांच्या अनेक शेळ्यांचा मृत्यू झाला आहे.

# श्रीलंकेतच आशिया चषक स्पर्धा घ्या पाकिस्तानच्या रमीझ राजाचा पाठिंबा

■ कराची

**श्रीलंकेत** सुरू असलेल्या अराजकतेनंतरही २७ ऑगस्टपासून आशिया चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन याच देशात व्हायला हवे, असे मत पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष रमीझ राजा यांनी व्यक्त केले आहे.श्रीलंकेत नागरिकांमध्ये असंतोष असताना यजमान देशाने ऑस्ट्रेलियाचे यजमानपद यशस्वीरित्या भूषविले होते, असे रमीझ राजा यांनी म्हटले आहे. पाकिस्तान बोर्डाच्या या निर्णयामुळे पर्यटनाला चालना मिळेल, शिवाय आर्थिक लाभही होऊ शकेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

पाकिस्तान संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर असून, उभय देशांमध्ये शनिवारपासून पहिली कसोटी खेळली जाईल. पीसीबी प्रमुख रमीझ राजा यांनी श्रीलंका क्रिकेटच्या (एसएलसी) अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यादरम्यान २७ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर या कालावधीत होणाऱ्या आशिया चषकाच्या आयोजनास आपला पाठिंबा असल्याचे सांगितले. यामुळे पर्यटनाला चालना मिळेल, शिवाय आर्थिक लाभही होऊ शकेल, असा विश्वास रमीझ यांनी व्यक्त केला. लंकेत लोकांच्या भावना तीव्र असल्या तरी पाकिस्तान संघ कोलंबो आणि गाले कसोटी खेळणार आहे.

# नांदेडच्या बाजारपेठेत पिसाळलेल्या घोड्याचा धुमाकूळ! ३ जणांना चावा

■ नांदेड

**नांदेडमध्ये** पिसाळलेल्या घोड्याने धुडगूस घालत तीन जणांना चावा घेतला. ही खळबळजनक घटना अर्धापूर येथील बाजारपेठेत काल शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली.

अर्धापूरमध्ये बाजारपेठेत अचानक एक घोडा घुसला आणि धुडगूस घालू लागला. त्यामुळे बाजारात एकच धावपळ उडाली. या पिसाळलेल्या घोड्याने तीन पादचाऱ्यांना चावा घेतला. यामध्ये तीनही व्यक्तींना गंभीर जखम झाली असून त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, बाजारपेठेत धुडगूस घालणाऱ्या घोड्याला पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी एकत्र येत सापळा रचून पकडले. दरम्यान या घोड्याला शहराबाहेर नेऊन सोडण्यात आलं.

# पराभवानंतर उमेदवाराचा मृत्यू

**भोपाळ** - मध्य प्रदेशच्या रीवा जिल्ह्यातील नगरसेवकपदाच्या निवडणुकीत पराभव झाल्यानंतर काँग्रेस उमेदवाराचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. नगर परिषदेच्या प्रभाग ९ मधून काँग्रेसच्या तिकिटावर हरिनारायण गुप्ता निवडणुकीच्या रिंगणात होते. मात्र, अपक्ष उमेदवार गुप्तांनी हरिनारायणांचा १४ मतांनी पराभव केला.


## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, सीटीएस क्र. ७४९-७५०, डॉ. व्ही. एल. सावंत मार्ग, भर्डावाडी, अंधेरी (प), मुंबई - ४०० ०५८ येथे स्थित न्यू एकता को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. च्या मालकीच्या "न्यू एकता" या इमारतीमधील ४ थ्या मजल्यावरील सदनिका क्र. ४०१च्या संदर्भातील मे. थवानी डेव्हलपर्स प्रा. लि. आणि कु. नसरीन इस्माईल मन्सुरी (सदनिका धारक) यांच्या दरम्यान बनलेले दिनांक २० एप्रिल, १९९२ रोजीचे मूळ करारपत्र हरवले आणि/किंवा गहाळ झाले आहे आणि अत्यंत परिश्रमपूर्वक शोधूनही सापडत नाही.
सदर मूळ करारपत्र जर कुणाच्या ताब्यात असल्यास आणि सदर करारपत्र ताब्यात असल्याच्या कोणत्याही कारणाद्वारे कोणताही दावा असल्यास; अशा व्यक्तींनी निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे आजच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत त्या दाव्याच्या समर्थनार्थ नोटरीकृत सत्य प्रतींसह तो दावा दाखल करावा, जो जर नोंदणीकृत न केल्यास, असे समजण्यात येईल की, अशा व्यक्ती/व्यक्तींचा दावा असलेला किंवा असा कोणताही दावा, हक्क, शीर्षक आणि हितसंबंध इ. सोडून दिलेआहेत आणि त्यानंतर असा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही.
दि. १६ जुलै, २०२२.
मे. शाह ॲण्ड संघवीकरिता
सही/
भागिदार
ॲडव्होकेट, सॉलिसिटर्स आणि आयपीआर वकील,
सौ. मीरा प्रमोद दौंडकर उर्फ
मीरा जेठमल ठाकर यांच्याकरिता
कार्यालय क्र. ११४/११५, ११ वा मजला,
"ए" विंग, मित्तल कोर्ट,
नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, सीटीएस क्र. ७४९-७५०, डॉ. व्ही. एल. सावंत मार्ग, भर्डावाडी, अंधेरी (प), मुंबई - ४०० ०५८ येथे स्थित न्यू एकता को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. च्या मालकीच्या "न्यू एकता" या इमारतीमधील ४ थ्या मजल्यावरील सदनिका क्र. ४०२च्या संदर्भातील मे. थवानी डेव्हलपर्स प्रा. लि. आणि कु. नसीम इस्माईल मन्सुरी (सदनिका धारक) यांच्या दरम्यान बनलेले दिनांक २० एप्रिल, १९९२ रोजीचे मूळ करारपत्र हरवले आणि/किंवा गहाळ झाले आहे आणि अत्यंत परिश्रमपूर्वक शोधूनही सापडत नाही.
सदर मूळ करारपत्र जर कुणाच्या ताब्यात असल्यास आणि सदर करारपत्र ताब्यात असल्याच्या कोणत्याही कारणाद्वारे कोणताही दावा असल्यास; अशा व्यक्तींनी निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे आजच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत त्या दाव्याच्या समर्थनार्थ नोटरीकृत सत्य प्रतींसह तो दावा दाखल करावा, जो जर नोंदणीकृत न केल्यास, असे समजण्यात येईल की, अशा व्यक्ती/व्यक्तींचा दावा असलेला किंवा असा कोणताही दावा, हक्क, शीर्षक आणि हितसंबंध इ. सोडून दिलेआहेत आणि त्यानंतर असा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही.
दि. १६ जुलै, २०२२.
मे. शाह ॲण्ड संघवीकरिता
सही/
भागिदार
ॲडव्होकेट, सॉलिसिटर्स आणि आयपीआर वकील,
सौ. मीरा प्रमोद दौंडकर उर्फ
मीरा जेठमल ठाकर यांच्याकरिता
कार्यालय क्र. ११४/११५, ११ वा मजला,
"ए" विंग, मित्तल कोर्ट,
नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.

## फॉर्म क्र. यूआरसी-२

प्रकरण XXIच्या भाग I अन्वये नोंदणीकरणाबाबत सूचना देणारी जाहिरात
[कंपनी कायदा, २०१३ चे कलम ३७४(बी) आणि कंपनी (नोंदणीकरिता प्राधिकृत) विनियमन, २०१४ च्या विनियमन ४(१) नुसार]

१. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ३६६ च्या उप-कलम (२) अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की, मुंबई येथील निबंधकांकडे आजपासून १५ दिवसांनंतर परंतु यानंतर तीस दिवस संपण्यापूर्वी असा अर्ज करणे प्रस्तावित आहे की, मे. एस्क्वायर कोरुगेशन, भागिदारी संस्थेचे, कंपनी कायदा, २०१३ च्या प्रकरण XXIच्या भाग I अन्वये नोंदणीकरण होऊ शकते.
२. कंपनीची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेतः
पक्षकारांद्वारे परस्पर संमतीने मंजूर केलेली किंवा करण्यात आल्यानुसार कोरुगेटेड बॉक्स आणि सर्व प्रकारची पॅकिंग सामग्रीचे उत्पादन हा संस्थेचा व्यवसाय आहे.
३. प्रस्तावित कंपनीचा निवेदन मसुदा आणि संघटनेची घटनेची प्रत प्लॉट क्र. ३९ए/१, सिंधी सोसायटी, चेंबूर, मुंबई - ४०००७१, महाराष्ट्र, भारत येथील कार्यालयात पाहता येईल.
४. याद्वारे सूचना देण्यात येते की, कोणाही व्यक्तीचा या अर्जास आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचे आक्षेप लेखी स्वरुपात निबंधक यांना मध्यवर्ती नोंदणीकरण केंद्र (सीआरसी), इंडियन इंस्टिट्यूट ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (आयआयसीए), प्लॉट क्र. ६, ७, ८, सेक्टर-५, आयएमटी मानेसर, जिल्हा गुरगाव (हरियाणा), पिन कोड १२२०५० येथे या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून एकवीस (२१) दिवसांच्या आत कळवावे व त्याची प्रत कंपनीस त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठवावी.

दिनांक १८ जुलै, २०२२
सही/-
एस्क्वायर कोरुगेशन
संजीव कपूर
रितिका मनसुखानी

## PUBLIC NOTICE

Written offers are invited by the trustee of **Dawat-E-Hadiyah** bearing **PTR NO. B-729 (MUM),** in sealed envelope for outright sale of the following residential flats, owned by the Dawat-E-Hadiyah, on ownership basis, in building called as "**Ahmed Tower**" situated at 16E Agripada Chawl Street, C.S.No.6/1865, Plot No.145, Agripada, Mumbai - 400 011.

| Sr. No. | Flat No. | Built Up Area. | Floor No. |
|---|---|---|---|
| 1. | 1204 | 360 sq. ft. | 12 |
| 2. | 1401 | 360 sq. ft. | 14 |
| 3. | 1404 | 360 sq. ft. | 14 |
| 4. | 1604 | 360 sq. ft. | 16 |
| 5. | 1701 | 360 sq. ft. | 17 |

Intending purchaser/s may make an offer for any one single flat or more flats. No offer for part sale of a flat shall be entertained by the trust. The said flats are being sold by the trust on "**as-is-where-is basis**". Intending purchaser/s shall deliver their offers at **Dawat-E-Hadiyah,** Badri Mahal, Dr. D.N. Road, Fort, Mumbai - 400 001, within 15 days of the publication of this notice along with an earnest money of **Rs.10,00,000/-** (**Rupees Ten Lacs Only**) for each flat by a Cheque/Demand Draft/Pay order. Offer without earnest money shall be out-right rejected.
The sale of the above property shall be subject to prior approval **u/s 36(1)** of the Maharashtra Public **Trusts Act, 1950,** of the Charity Commissioner, Maharashtra State, Mumbai.
Conditional offers shall not be accepted and the trust reserves the right to accept any offer with or without modification or reject the offer without assigning any reason whatsoever.

Dated: 18th July, 2022.
Place: Mumbai
For Dawat-E-Hadiyah
Sd/-
(Authorised Signatory)

## नवी मुंबई महानगरपालिका

शहर अभियंता विभाग

निविदा सुचना क्र- नमुंमपा/कार्यकारी अभियंता(ठाबेर)/128/2022-23.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील महापे अंडरपास येथील उतरणीच्या उजवीकडील बाजूच्या भिंतीस 3D/मॉडर्न आर्टचे रंगकाम करणे.(79434) | 4,35,976/- |
| 2 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील C पुलाखालील P-10 ते P-11 मधील गर्डरची रंगरंगोटी करणे.(80727) | 4,36,994/- |
| 3 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील कोपरी पुलाच्या दोन्ही साईडला रंगरंगोटी करणे.(80979) | 4,32,355/- |
| 4 | ठाणे बेलापूर रोडवरील नोसील नाका समोरील उर्वरीत नाल्यास Chain Link Fencing करणे.(78936) | 4,38,743/- |
| 5 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील महापे अंडरपास येथील डावीकडील मध्यवर्ती बाजूच्या भिंतीस 3D/मॉडर्न आर्टचे रंगकाम करणे.(79410) | 4,41,631/- |
| 6 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील पावणेश्वर प्रवेशद्वार समोरील पुलाच्या गर्डरला रंगरंगोटी करणे.(81006) | 4,28,358/- |
| 7 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील मारुती शोरुम समोरील ब्रिजला रंगरंगोटी करणे.(80785) | 4,40,465/- |
| 8 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील C पुलाखालील P-1 ते P-3 मधील गर्डरची रंगरंगोटी करणे.(80718) | 4,30,188/- |
| 9 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील तुर्भे रेल्वे स्टेशन येथील सार्वजनिक शौचालयाजवळच्या भिंतीना रंगरंगोटी करणे.(80965) | 4,41,948/- |
| 10 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील पावणेश्वर पुलाच्या वाशीकडे जाणा-या गर्डरची रंगरंगोटी करणे.(83064) | 4,20,587/- |
| 11 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील तुर्भे ते महापे येथील रस्ता दुभाजकामधील व उदयानामधील पाईपलाईनची दुरूस्ती करणे.(82324) | 4,26,212/- |
| 12 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील महापे ब्रिज येथील चढणीच्या उजवीकडील बाजूच्या भिंतीस 3D/मॉडर्न आर्टचे रंगकाम करणे.(79448) | 4,37,333/- |
| 13 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील घणसोली रेल्वे स्टेशन समोरील मोकळया जागेचे सुशोभिकरण करणे.(79591) | 4,32,615/- |
| 14 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील C पुलाखालील P-7 ते P-8 मधील गर्डरची रंगरंगोटी करणे.(80724) | 4,32,119/- |
| 15 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील कोपरी ब्रिजशेजारील भिंतीना रंगरंगोटी करणे.(80562) | 4,43,659/- |
| 16 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील महापे अंडरपास येथील उजवीकडील मध्यवर्ती बाजूच्या भिंतीस 3D/मॉडर्न आर्टचे रंगकाम करणे.(79518) | 4,36,240/- |
| 17 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील महापे जंक्शन परीसरात सुशोभिकरण करणे.(79589) | 4,32,474/- |
| 18 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील C पुलाखालील P-14 ते P-15 मधील गर्डरची रंगरंगोटी करणे.(80741) | 4,34,526/- |
| 19 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील कोपरी ब्रिज येथील पियर क्र. 1 ते 3 ची रंगरंगोटी करणे.(80953) | 4,38,637/- |
| 20 | ठाणे बेलापूर रस्त्यालगतच्या सर्व्हीस रोड लगतच्या उदयानामधील पाईपलाईनची दुरूस्ती करणे.(82326) | 4,35,749/- |
| 21 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील पावणे फुटओव्हर पुलाच्या पियरची रंगरंगोटी करणे.(83066) | 4,38,513/- |
| 22 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील महापे अंडरपासच्या उतरणीच्या मध्यवर्ती भाग-2 मध्ये रंगरंगोटी करणे.(80482) | 4,42,008/- |
| 23 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील Duluxe Company जवळील सी पुलाखालील पीयरची रंगरंगोटी करणे.(83165) | 3,88,049/- |
| 24 | ठाणे बेलापूर रस्त्यावरील महापे ते विटावा येथील रस्ता दुभाजकामधील व उदयानामधील पाईपलाईनची दुरूस्ती करणे.(82321) | 4,35,749/- |

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणकप्रणालीच्या https://nmmc.etenders.in या संकेतस्थळावर व नमुंमपाच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर दिनांक- 18/ 07 /2022 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://nmmc.etenders.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संपर्क करावे.

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता (कोपरखैरणे)
नवी मुंबई महानगरपालिका

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/409/2022

नवाकाळ
web:http://navakal.in | e-mail: navakal.1923@gmail.com

# चंदेरी च्वींगम

‘तुझ्यात जीव रंगला’मधील वाहिनीसाहेब हि व्यक्तिरेखा अजूनही प्रेक्षक विसरले नाही. वाहिनीसाहेबाचा धाक आणि दरारा आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. वाहिनीसाहेब हि भूमिका साकारणारी अभिनेत्री **धनश्री काडगावकर** झी मराठीवरील तू चाल पुढं या मालिकेत पुन्हा एकदा नकारात्मक भूमिका साकारताना दिसणार आहे. हि मालिका १५ ऑगस्टपासून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. धनश्री सोबत तिच्या या नवीन भूमिकेबद्दल साधलेला हा खास संवाद.

## पुन्हा एकदा नकारात्मक भूमिकेत !



**या मालिकेतील तुझ्या भूमिकेबद्दल काय सांगशील?**

- या मालिकेत माझ्या व्यक्तिरेखेचं नाव शिल्पी आहे, जी तिच्या माहेरी येऊन राहतेय आणि तिला सतत असं वाटतं कि तिच्या आयुष्यात जे काही चुकीचं घडलं त्याला कारणीभूत फक्त आणि फक्त अश्विनी आहे. त्यामुळे शिल्पी अश्विनीला सतत घालून पडून बोलते, प्रत्येक गोष्टींमध्ये तिच्या चुका काढते जस प्रोमोमध्ये देखील प्रेक्षकांनी पाहिलं कि शिल्पी कशी तिच्या वहिनीला टोमणे मारते.

**या मालिकेबद्दल काय सांगशील?**

- अश्विनी नावाची गृहिणी जी आपल्या कुटुंबासाठी आणि कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला खुश ठेवण्यासाठी सर्वतोपरी मेहनत घेते, राबतेय हि तिची कहाणी आहे. एक सर्वसामान्य बाई असण्यापासून ते कुटुंबासाठी काहीतरी करण्यासाठी तिची स्वप्न कशी बदलत जातात आणि ती स्वप्न ती कशी पूर्ण करते. तिचा स्वप्नपूतीर्चा प्रवास या मालिकेत दाखवण्यात आला आहे.

**तुझ्यामध्ये आणि तुज्या व्यक्तिरेखेमध्ये किती साम्य आहे?**

- मी देखील खऱ्या आयुष्यात सडेतोड आहे. मी समोरच्याला पटकन बोलू शकते पण चूक आणि बरोबर याचा विचार करून मी बोलते. तसं शिल्पीच नाही आहे. तिचा जिथे फायदा आहे तिथे ती गोड बोलते. तिचं काम झालं कि परत ती त्या माणसाशी नीट बोलेलच असं नाही.

**मालिकेचा प्रोमो रिलीज झाल्यावर तुला कसा प्रतिसाद मिळाला?**

- प्रेक्षकांकडून खूप उत्तम प्रतिसाद मिळतोय. मला याआधी नंदिता वाहिनीच्या भूमिकेत ४ वर्ष प्रेक्षकांनी कोल्हापुरी भाषेत बोलताना, साडी आणि दागिने घालून मिरवताना पाहिलं आहे. या मालिकेत माझा लुक खूपच वेगळा आहे त्यासाठी देखील खूप छान प्रतिक्रिया मला मिळत आहेत.

## अजून प्रवास मोठा आहे पण पहिला टप्पा आज गाठला !

सुबोध भावे हा सोशल मीडियावर नेहमी सक्रीय असतो. नुकतंच सुबोधने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. यात त्याने त्याच्या निर्मिती संस्थेच्या पहिल्या वेबसीरिजमधील टीमचा फोटो शेअर केला आहे. याला त्याने हटके कॅप्शनही दिले आहे. कान्हाज मॅजिक या आमच्या निर्मिती संस्थेची पहिली वेब सीरिज. आणि या पहिल्या वेब सीरिजचा शूटिंगचा पहिला टप्पा आज संपला. २२ मे पासून पुणे,भोर, वाई आणि परत पुणे अस सलग ५७ दिवस संपूर्ण टीम न थांबता,न थकता, अविश्रांत मेहेनत घेऊन काम करत होती. अजून प्रवास मोठा आहे पण पहिला टप्पा आज गाठला. पुन्हा सप्टेंबर मध्ये शूट चालू होईल आणि मग खऱ्या अर्थाने या वेब सीरिज च शूट संपेल. यात कोण दिग्दर्शन करतय, कोण काम करतय हे सगळंच तुमच्या समोर येईल. माझ्या संपूर्ण संघाचे मनपूर्वक आभार.





## दिव्येंदु शर्माचा ‘मेरे देश की धरती’ ॲमेझॉन प्राइमवर



सध्या ऑनलाइन प्लॅटफोर्मवर वेगवेगळ्या मनोरंजक चित्रपटांचा नजराणा प्रेक्षकांना अनुभवायला मिळत आहे. चित्रपटांच्या या रंजक प्रवासात प्रेक्षकांची आणि समीक्षकांच्या पसंतीची पोचपावती मिळवणारा दिव्येंदु शर्माचा ‘मेरे देश की धरती’ हा चित्रपट आता प्रेक्षकांना घरबसल्या ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवर’ पहाता येणार आहे. वेगळा विषय मांडणारा हा चित्रपट थिएटरमध्ये पाहण्याची तुमची संधी हुकली असेल तर आता या चित्रपटाचा आस्वाद ‘ॲमेझॉन प्राइम’वर घेता येईल. नुकताच हा चित्रपट ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवर’ आला आहे. ‘ॲमेझॉन प्राइम व्हिडिओ’च्या निमित्ताने हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आल्याने प्रेक्षकांकडून आनंद व्यक्त होत आहे.

# चातुर्मास आहार आणि आरोग्य

हेल्दी Me

**आषाढ शुद्ध एकादशी ते कार्तिक शुद्ध एकादशी या चार महिन्यांच्या काळास चातुर्मास म्हणतात. आषाढ शुद्ध एकादशीस ‘देवशयनी’ एकादशी असेही म्हटले जाते. या दिवशी देव झोपी जातात ते कार्तिक शुद्ध एकादशीस झोपेतून जागे होतात. भगवान श्रीविष्णूच्या उपासनेसाठी चातुर्मासाचा कालावधी सर्वश्रेष्ठ मानला जातो.**

**चातुर्मास म्हणजे केवळ भरपूर सण, व्रतवैकल्य असे नसून, त्याचा संबंध जीवनशैलीशी संबंधित आहे. ऋतुचक्राशी निगडीत असणारे हे सण, व्रते एकूणच सात्त्विकतेशी जोडलेली आहेत. चातुर्मास काळात आपला आहार कसा असावा, याबाबतही सांगण्यात आले आहे. या चातुर्मासाचा आपल्या आहार आणि आरोग्याशी कसा संबंध आहे ते जाणून घेऊयात आजच्या लेखातून..**

**आपल्याकडील** अनेक सण-उत्सव निसर्गचक्रानुसार साजरे करण्याची परंपरा आहे. याची वैज्ञानिक बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. आषाढ, श्रावण, भाद्रपद, कार्तिक महिन्यात आपल्या संस्कृतीत सण, उत्सव यांची रेलचेल असते. हाच उत्सव आपण ‘चातुर्मास’ म्हणून साजरा करतो. हिंदू संस्कृतीत व्रत-वैकल्ये, उपवास, पूजापाठ, अनुष्ठान, पारायण आदींसाठी हा चार महिन्यांचा कालावधी पवित्र आणि महत्त्वाचा समजला जातो. चातुर्मासाचा काळ हा जवळपास पावसाळ्याचा काळ असतो. या कालावधीत आपली पचनशक्ती मंद झालेली असल्याने या काळात पचण्यास हलका आणि कमी आहार घ्यावा असे सांगितले आहे. आधुनिक वैद्यकशास्त्र आणि आयुर्वेदही ते मान्य करतो.

चातुर्मासाच्या काळात काही नेम करावा, असे आपल्याकडे सांगण्यात आले आहे. त्यामुळेच चातुर्मासाच्या कालावधीत पर्णभोजन (पानावर जेवणे), अयाचित (न मागता मिळेल ते जेवणे), एकवाढी (सर्व पदार्थ ताटात एकदाच वाढून घेणे), मिश्र भोजन (सर्व पदार्थ ताटात एकदाच वाढून घेऊन त्याचा काला करून जेवणे), एकभुक्त (फक्त एकदाच जेवणे) असा ‘नेम’ करण्यास सांगितले आणि त्याला व्रताची जोड दिली. हा ‘नेम’ म्हणजे आपल्या निरोगी शरीरासाठी उपयुक्त आणि गरजेचा आहे. आता आपण चातुर्मासातील महिन्यानुसार आहार आणि त्या आहाराशी निगडित आरोग्य याचा आढावा घेऊ...

आषाढ एकादशीच्या उपवासापासून चातुर्मासाची सुरुवात होते. आषाढ महिन्यात पावसाचा जोर प्रचंड असतो. वातावरण कुंद असते. त्यामुळे शरीरात उष्णता निर्माण होण्यासाठी आणि शरीराला ऊर्जा मिळण्यासाठी आपल्याकडे आषाढ तळण्याची पद्धत आहे. त्यामध्ये शंकरपाळी, कापण्या, विविध तळणीचे पदार्थ केले जातात. दिव्याच्या अमावस्येला गूळ घातलेले कणकेचे दिवे करण्याची पद्धत आहे. हे दिवेही खूप आरोग्यदायी असतात.

### कांदा, लसूण वर्ज्य का?

चातुर्मासात वर्ज्य आहेत. मुळातच कांदा आणि लसूण हे पचायला जड आहेत. पचनशक्ती मंद झाल्याने तळलेले किंवा मसालेदार पदार्थ खाणेही आरोग्यासाठीही चांगले नाही. त्यामुळेच पूर्वजांनी या चार महिन्यात कांदा, लसूण खाऊ नका असे सांगितले आणि त्याला धार्मिकतेची जोड दिली. आध्यात्मिक दृष्ट्या हे पदार्थ तामसी आहारात मोडतात. यामुळे मनुष्याच्या काम, क्रोध या विकारांची वृद्धी होते अशी धारणा आहे. आषाढ महिन्यातील पहिली नवमी ‘कांदे नवमी’ म्हणून साजरी केली जाते. या दिवशी कांद्याची भजी करून खाल्ली जातात, कांद्याचा विपुल प्रमाणात वापर केला जातो. नंतर कांदा खाऊ नये त्यासाठी आधी ही सोय सांगितली आहे. मांस-मटण, मासे हेही पचायला जड असतात. शिवाय पावसाळ्यामुळे प्राणीही रोग ग्रस्त होण्याची शक्यता असते. त्यामुळे त्याचेही सेवन करू नये, असे सांगितले गेले आहे.

तसेच काही लोक श्रावण महिनाभर मांसाहार करत नाहीत. त्यामुळे काही लोक या दिवशी मनसोक्त मांसाहार करतात.

श्रावण महिना म्हणजे व्रत-वैकल्यांचा महिना आणि उपवासाचा महिना. या महिन्यात विविध सणांची जशी रेलचेल असते तशीच विविध खाद्यपदार्थांची देखील असते. श्रावणात केले जाणारे सोमवार, गुरुवार, शनिवारचे उपवास आणि उपवासाचे नाना पदार्थ, नागपंचमीला केलेले पुरणाचे दिंड, ज्वारीच्या लाह्या आणि दूध, सत्यनारायणाच्या दिवशी केळे, साजूक तूप, सुकामेवा घालून केलेला प्रसादाचा शिरा, श्रावणी शुक्रवारी हमखास केली जाणारी पुरणपोळी, हळदी-कुंकवाच्या निमित्ताने महिलांना दिले जाणारे गूळ आणि फुटाणे, नारळी पौर्णिमेला केला जाणारा नारळी भात, ओल्या खोबऱ्याच्या वड्या, मंगळागौरीला केला जाणारा धान्य फराळ, गोकुळाष्टमीच्या दिवशीचा दही, पोहे, काकडी, डाळिंब दाणे घालून केलेला गोपाळकाला .... अशा पदार्थांची लयलूट श्रावण महिन्यात झालेली असते. हे पदार्थ नुसतेच चवीढविचे नसतात तर यात अनेक जीवनसत्वे, प्रथिने, कर्बोदके, असल्याने आपल्या शरीरासाठी ते अतिशय पोषक आणि आरोग्य पूर्ण ठरतात.

मंगळागौरी देवीची पूजा झाल्यानंतर महिला विविध खेळ खेळून रात्र जागवतात. यालाच मंगळागौरीचे खेळ असे म्हणतात. या खेळात फुगड्या, झिम्मा, पिंगा आणि अन्य काही खेळ असतात. महिलांच्या शारीरिक आरोग्यासाठी हे सर्व खेळ पूरकच आहेत.

भाद्रपद महिन्यात ऋषीपंचमीच्या दिवशी केली जाणारी विविध कंदमुळे घालून केलेली ऋषीची ओले खोबरे, मिरची घालून केलेली सात्विक भाजी चवीला अतिशय साधी पण पौष्टिक असते. या दिवसांत घरोघरी केला जाणारा गणपती बाप्पाचा आवडता नैवेद्य म्हणजे मोदक. हा तर पोषणमूल्यांचा उत्तम स्त्रोत आहे. गणपती बाप्पाला आवडणाऱ्या दुर्वा आणि इतर पत्री देखील खूप औषधी समजली जाते.

गौरी पूजनाच्या दिवशी पुरणावरणाचा साग्रसंगीत स्वयंपाक केला जातो. यात भरपूर भाज्यांचा समावेश असतो. त्यामुळे अनेक आरोग्यपूर्ण गोष्टी पोटात जातात.

याशिवाय भाद्रपद महिन्यात पितृपक्षही येतो. पितरांसाठी केला जाणारा स्वयंपाक पूर्ण वेगळा असतो. तांदळाची खीर, आमसुलाची चटणी, भरड्याचे वडे, गवार, लाल भोपळा भाजी असे पदार्थ पितृपक्षात केले जातात. तांदळाची खीर ही अतिशय पौष्टिक तर आमसुलाची चटणी ही पित्तशामक असते.

सर्वपित्री अमावस्या संपली की आश्विन महिन्याला सुरुवात होते. या महिन्यात आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून विजयादशमीपर्यंत शारदीय नवरात्र असते. या दिवसात देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. देवीची आराधना म्हणून नऊ दिवस उपवास करण्याची पद्धत आहे.

### बहुगुणी तुळस

चातुर्मासाच्या काळात तुळशीची पूजा आणि प्रदक्षिणाही व्रत म्हणून करावी, असे सांगितले आहे. भगवान विष्णूला तुळस अतिशय प्रिय आहे. ही कफ, वातशामक, जंतुनाशक आहे. पावसाळ्याच्या दिवसात होणारी सर्दी, खोकला, ताप आदी आजारांवर तुळस हे रामबाण औषध आहे.



आरोग्याच्या दृष्टीने उपवास करणे योग्य असून उपवासामुळे रोगांवर नियंत्रण केलं जाऊ शकतं. नऊ दिवस योग्य प्रकारे उपवास केल्याने सकारात्मक परिणाम पाहायला मिळतात. या दरम्यान हलका आहार घेऊन मळमळणे, पित्त, जुलाब, जळजळ सारख्या तक्रारींवर नियंत्रण मिळविता येते. लठ्ठपणा कमी करण्यासाठी उपवास एक चांगला पर्याय आहे. मात्र एकादशी आणि दुप्पट खाशी असा प्रकार करू नये. त्याने उलटाच परिणाम होतो.

विजयादशमी अर्थात दसऱ्याला घरोघरी बहुधा मस्त श्रीखंड-पुरीचा बेत असतो. श्रीखंडामध्ये आढळणारे गुड बॅक्टेरिया इम्यून सिस्टमला चांगलं ठेवण्यात मदत करतात. सोबतच यात भरपूर प्रमाणात कॅल्शियम आणि फॉस्फरस असतं, जे हाडांच्या मजबुतीसाठी फायद्याचे असते. त्यानंतर येते ती कोजागिरी पौर्णिमा. या दिवशी चंद्र पृथ्वीच्या खूप जवळ येतो. आकाशात टिपूर चांदणं पडलेलं असतं, दूध आटवून त्यात केशर, पिस्ते, बदाम, चारोळी, वेलदोडे, जायफळ, साखर घालून केलेल्या दुधात चंद्राचं प्रतिबिंब पडलं की ते अधिक औषधी होतं असं म्हणतात.

त्यानंतर येणारा सण म्हणजे दिवाळी. दिवाळी हा सण म्हणजे सणांचा राजा. दिवाळसण हा आश्विन महिन्यात येतो, जो निसर्गसौंदर्याच्या आविष्काराचा आणि धान्याच्या संपन्नतेचा काळ असतो. हे धान्य मिळवण्यासाठी काबाडकष्ट करावे लागणारा शेतकरी मागच्या चार महिन्यांतल्या पर्जन्यकाळामधील कृषीकार्याने थकून गेलेला असतो आणि आता त्या कष्टाचा आनंद घेण्यासाठी आतुर झालेला असतो. आरोग्यशास्त्राच्या दृष्टीनेही विचार करता हा विसर्गकाळ आहे. जेव्हा निसर्गात होणारे बदल शरीरबल वाढवण्यास पोषक ठरतात. वास्तवात दिवाळी हा थंडीतला सण. थंडीतले निरोगी वातावरण, त्यात धनधान्य मुबलक. अशा वेळी बलवर्धन करणाऱ्या आहार सेवनाचा विचार पूर्वजांनी केला, हे स्वाभाविकच म्हणायला हवे. दिवाळीत थंडी असते. त्यामुळे या काळात शरीराला ऊर्जा मिळावी म्हणून चकली, करंजी, लाडू, चिवडा, अनारसे अशा कितीतरी पदार्थांची निर्मिती करण्यात आली. आता सर्वजण डाएट concious झाले असल्याने मैदा, साखर, यांना पर्याय म्हणून असलेले गहू, नाचणी, ज्वारी, मूगडाळ, गूळ, खजूर असे विविध घटक वापरून फराळ जास्त पौष्टिक कसा होईल याकडे लक्ष दिले जाते. तळलेल्या फराळापेक्षा baked फराळालाही चांगली मागणी आहे.

कार्तिक शुद्ध एकादशीस देव झोप घेऊन जागृत होतात; म्हणून तिला ‘प्रबोधिनी (बोधिनी, देवोत्थानी) एकादशी’ असे म्हटले जाते. या दिवशीही उपवास केला जातो. या दिवशी चातुर्मासाची सांगता होते. थोडक्यात काय तर, या काळात आपल्या पोटातील अग्नी मंद झालेला असल्याने व्रत-वैकल्य, उपवास याच्या माध्यमातून आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य सांभाळणे, आत्मिक शांतीचा अनुभव घेणे हा या चातुर्मासाचा मुख्य उद्देश आहे.

पुढील लेखातून आपण उपवासाच्या पदार्थांचा आपल्या आरोग्याशी असलेला संबंध या विषयी जाणून घेणार आहोत.

(डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतेही उपचार करू नयेत.)

संकलन - अश्विनी मेढी-घाटपांडे










# नवाकाळ शब्दकोडे-२३९



**आडवे शब्द –**

१. डोळ्यांना न दिसणारे ५. पार्वतीचे एक रूप ७. आक्रमक, हल्ला करणारे ९. वस्त्र, पोशाख १०. पांडवांनी जगज्जेतेपदासाठी केलेला यज्ञ ११. अंगावर काटे असलेला प्राणी, साळींदर १३. फिदा, प्रेमात पडलेला १४. निधन १७. शिफारस, कौतुक १९. औदार्य, मनाचा मोठेपणा २२. चारित्र्यवान २३. खूप २४. आवाज २५. छोटा घोडा २६. भीतीदायक २९. बिनविषारी जातीचा एक साप ३०. झाड, वृक्ष ३०अ. देवांचा राजा ३१. भिडेपोटी ३३. नशीब ३४. फुलांचा गुच्छ ३७. संपत्ती ३८. रामाचा मुलगा ३९. अब्रू, प्रतिष्ठा ४०. वक्र, शत्रुत्व ४१. लाभदायक ४३. कर्णाचा कौतुकास पात्र गुण ४६. अर्भकाचे डोईवरचे केस ४७. कृत्य ४८. दूध, पय ४९. माजलेला ५०. उजळणी, अभ्यास ५२. अखंड, अविरत ५४. त्रस्त ५६. नातलगांचा गोतावळा ५७. सौंदर्य ६०. समान ६१. स्थूल, जाड ६२. संन्यासी ६३. लुबाडणे, बळजबरीने ताब्यात घेणे ६४. जमिनीशी काटकोनात असलेली उभी रेषा ६६. विडा रंगवणारा घटक ६९. एक आंबट पालेभाजी ७१. आयत्या वेळी कच खाणारा, पळपुटा ७४. मरायला टेकलेला ७५. गारवा, थंडी, हिव ७६. नारळाची करवंटी ७८. चहाडी, कलागत ८०. यातून झाड अंकुरते ८३. मोफत ८४. केशतेलातील एक उष्ण वनस्पती ८६. कमतरता ८८. अजागळ ९१. बावर्ची, स्वयंपाकी ९२. टिकाव, टिकून राहणे ९३. धनुष्य ९४. रात्र, निशा ९६. गायीचे पिल्लू ९८. गारगोटीचा दगड ९९. सखी, जोडीदारीण

**उभे शब्द –**

१. बदनामी, दुष्कीर्ती २. हेकेखोर, दुराग्रही ३. ओरखडा ४. धोबी, परीट ५. सनदशीर, वैध ६. माणूस, मनुष्य ७. सावकाश, संथ ८. फुफ्फुसाचा एक आजार ११. लहान, छोटा १२. दया १५. त्रास १६. ध्येय, लक्ष्य १७. सुसाट, अतिशय वेगात १८. शाकाहारी चौरस जेवणातील दोन पदार्थ २०. आदराने मस्तक झुकवलेला २१. अशुभ, वाईट २२. सोपे २७. गमतीदार २८. ताजा, टवटवीत ३०अ. शाई (इं.) ३१. गव्हाची खीर ३२. स्तोत्र ३५. मोठेपणा ३६. सोनेरी सुगंधी फूल ३७. अपत्य ३९. पंख ४०. पांथस्थ ४१. शिसारी, घाण नजरेसमोर आल्यावरची भावना ४२. लिव्हर ४४. रावणाची बहीण ४५. अंतःकरण ४८. अशक्त ४९. स्वार्थ ५१. मासे पकडण्याचे जाळे ५३. खरेपणा, सत्यांश ५५. लाडूचा एक प्रकार ५६. गरजवंत ५८. मंदिर, देवालय ५९. जमाव ६४. रावणाची राजधानी ६५. अवमान ६६. बांगड्यांचा विक्रेता ६७. दगा ६८. चमत्कार, जादू ६९. चटपटीत प्रत्युत्तर देणारा ७०. राक्षस ७२. मोठा बेत, डोंगरातला रस्ता ७३. पिकांवर कीड होऊ नये म्हणून मारण्याचे औषध ७४. पेठ, मोहल्ला ७५. धाटणी, ढब ७७. लग्गा, वशिला ७९. बोभाटा, बभ्रा ८१. पार्वतीचे उग्र रूप ८२. धार्मिक ग्रंथप्रकार, रचना, संग्रह ८४. गर्दन, आदराची वागणूक ८५. व्याकूळ ८७. घोड्याचे पिल्लू ८९. माळ ९०. मीठ ९१. वाळवलेला खजूर ९५. समस्या, अडचण ९७. खरे, ऋत •

**नवाकाळ कोडे क्रमांक २३८ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. साधू ३. शाबासकी ६. पाशवी ८. अनेक ११. मजाल १३. संगनमत १६. माल १७. साकेत १८. तगमग १९. दागदागिने २२. करंडी २३. मही २८. यार २९. शालक ३१. शिरोधार्य ३२. मच्छरदाणी ३४. मवसर ३५. वन्ही ३६. सदा ३८. दारुडा ४०. कण ४१. रेघ ४३. कंचनी ४६. पटू ४७. जिन ४८. सोनपापडी ५१. हावरट ५२. वाटा ५३. खरा ५४. वळ ५५. कर ५६. जिराईत ५७. फड ५९. यमक ६१. कल ६२. कामी येणे ६५. दाह ६६. विनाशकाल ६९. अलका ७१. सूत ७३. नावलौकिक ७४. ढलपी ७६. अलगद ७७. आवर ७९. कवळ ८०. पलटवार ८१. कोकम तेल ८४. पथ्य ८६. अट ८७. मढ ८८. थोर ८९. तडस ९२. काटक ९३. रडे ९४. तमा ९६. सव्वा लाखाची ९८. कल्याण ९९. मोक्ष १०१. काहूर १०२. जड १०३. सारण १०४. तारणहार

**उभे शब्द :** २. धूमकेतू ३. शाल ४. सवंगडी ५. टांग ६. पाम ७. शतदा ९. नेमाने १०. कल १२. जात १३. संगमरवर १४. नशा १५. धंदा १८. तरंगिणी २०. गर्ता २१. गिर्यारोहण २४. बैल २५. पर्यवसान २६. हम करे सो कायदा २७. वारस २८. याम २९. शारदा ३०. कवडा ३३. दादा ३७. नाच ३९. रुक्ष ४०. कटू ४२. घन ४३. कंडी ४४. नीहार ४५. दूरगामी ४६. पटाईत ४७. जिराफ ४९. पावक ५०. पळ ५२. वारा ५५. कलश ५६. जिणे ५८. डग्गा ६०. महसूल ६१. कनात ६२. काल ६३. येथवर ६४. चालढकल ६७. काटवट ६८. चिकित्सक ७०. कालव ७२. तगडा ७५. पीळदार ७६. अनुपस्थित ७७. आलय ७८. रवाना ८१. कोटकल्याण ८२. ममता ८३. तेढ ८५. अडसर ८६. अटकर ८८. थोडे ९०. सव्वा ९१. आखाड ९३. रक्षण ९५. माका ९७. लाज ९९. मोर १००. भर

# भारतीय तिरंग्याचे रचनाकार पिंगली वेंकय्या

**पिंगली वेंकय्या.. हे नाव फारसे कुणाला माहीत नाही. भारताच्या राष्ट्रध्वजाची कल्पना मांडली ती याच पिंगली वेंकय्या यांनी. ध्वज कोणत्या रंगाचा असावा, त्यात किती आणि कोणते रंग असावेत, त्याचा आकार कसा असावा याचा सखोल अभ्यास करून त्यांनी तिरंगा साकारला. ते केवळ तिरंग्याचे निर्माते नव्हते तर जपानी भाषेचे शिक्षक, सिद्धहस्त लेखक आणि जिओफिजिसिस्टही होते. मछलीपट्टनममध्ये माध्यमिक शिक्षण पूर्ण करून पिंगली वेंकय्या पुढील शिक्षणासाठी कोलंबोला गेले.**

भारतात परत आल्यावर प्रथम त्यांनी एका रेल्वे गार्डची नोकरी व नंतर बेल्लोरीमधे सरकारी नोकरी केली. तद्नंतर त्यांनी एंग्लो वैद्यकीय महाविद्यालयात उर्दू आणि जपानी भाषेच्या अभ्यासाकरिता लाहोर गाठले. वेंकय्या यांनी बऱ्याच विषयांची ज्ञानप्राप्ती केलेली. त्यापैकी भूविज्ञान आणि कृषीक्षेत्राशी जास्त संबंध होता. तसेच ते हिऱ्यांच्या खाणीत विशेषज्ज्ञ देखील होते. वेंकय्या यांनी ब्रिटिश भारतीय सेनेमध्ये पण नोकरी केली होती आणि एंग्लो-बोअर युद्धामध्ये पण ते सहभागी झाले होते. त्याच काळात ते गांधीजींच्या संपर्कात आले आणि त्यांच्या विचारांनी प्रभावित झाले.

१९०६ ते १९११ पर्यंत वेंकय्या कापसाच्या वेगवेगळ्या प्रकारच्या अभ्यासात मग्न झाले. आणि त्यांनी बॉम्वोलार्ट कंबाडीया प्रकारच्या कापसावर एक अध्ययन देखील प्रकाशित केले. आणि त्यावरुन वेंकय्या हे कपास वेंकय्या म्हणून प्रसिद्ध झाले. काकीनाडा मध्ये आयोजित केलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आयोजित अधिवेशना दरम्यान भारताचा स्वतःचा राष्ट्रध्वजाची आवश्यकता यावर भर दिला आणि त्यांचे हा विचार गांधीजींना पटला. मग गांधीजींनीच त्या राष्ट्रध्वजाची रचना करण्यास सुचवले. त्यानंतर १९१६ ते १९२१ पर्यंत वेंकय्या यांनी तब्बल पाच वर्षे विविध ३० देशांच्या राष्ट्रध्वजाचा अभ्यास केला आणि नंतर तिरंग्याचा विचार केला.

१९२१ साली विजवाडा येथे आयोजित भारतीय राष्ट्रीय काँग्रेस च्या अधिवेशनात महात्मा गांधींना त्यांनी बनवलेल्या हिरव्या आणि लाल रंगाचा ध्वज दाखवला व त्यापुढे प्रत्येक अधिवेशनात हा द्विरंगाचा ध्वज वापरला जात होता. पण त्यावेळी अधिकारीकरित्या काँग्रेसकडून या झेंड्याला मान्यता मिळाली नाही. यादरम्यान जालंधरच्या हंसराज यांनी झेंड्यामध्ये चक्रीय चिन्हाचा समावेश करण्याचे सुचविले. या चक्राला सामान्य माणूस व प्रगतीच्या रुपात पाहिलं जात होतं.

नंतर गांधीजींच्या सुचवलेल्या विचारानुसार शांतीचे प्रतिक मानलं जाणाऱ्या पांढऱ्या रंगाचा समावेश देखील त्यामध्ये करण्यात आला.



पुढे १९३१ मध्ये केशरी, हिरवा आणि पांढऱ्या रंगाच्या तिरंगा ध्वजास काँग्रेसने कराचीमध्ये आयोजित अखिल भारतीय संमेलनामध्ये सर्वसंमतीने स्विकारीत केलं. नंतर ध्वजामध्ये असलेल्या चरख्याची जागा अशोकचक्राने घेतली. पिंगली वेंकय्या यांचे ४ जुलै १९६३ रोजी निधन झाले.

# विधानपरिषद विरोधी पक्षनेते पदावर काँग्रेसनेही केला दावा

■ मुंबई

**विधान** परिषदेत शिवसेनेचे ११ आमदार असून विरोधी पक्षात सर्वाधिक आमदारांची संख्या शिवसेनेचीच आहे, असे म्हणत ठाकरेंच्या शिवसेनेने विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदावर यापूर्वीच दावा केला आहे. अशातच आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही शिवसेनेवर कुरघोडी करत जाहीरपणे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपद काँग्रेसला मिळावे अशी मागणी केली आहे. यासाठी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात हे शिवसेना आणि राष्ट्रवादीशी चर्चा करत आहेत, अशी माहितीही पटोले यांनी यावेळी दिली.

आज झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना नाना पटोले म्हणाले की, वरच्या सभागृहात आमचा विरोधी पक्षनेता व्हावा अशी प्रमुख मागणी राहील. शिंदे गट-भाजप सरकार राज्यात स्थापन झाल्यावर विधानसभेत राष्ट्रवादीचे अजित पवार यांची विरोधी पक्षनेते म्हणून निवड करण्यात आली होती. त्यानंतर विधान परिषदेत आमचा विरोधी पक्षनेता असावा, अशी मागणी आम्ही राष्ट्रवादी आणि शिवसेनेकडे करणार आहोत.

**शिवसेना-राष्ट्रवादीशी चर्चा करणार**

दरम्यान, पटोलेंच्या या दाव्यानंतर विरोधी पक्षनेतेपदावरुन काँग्रेस आणि शिवसेना असा सामना रंगण्याची शक्यता आहे. कारण शिवसेनेची संख्या जास्त असून आपला विरोधी पक्षनेता विधान परिषदेत नेमण्यात यावा, याविषयीचा ठराव शिवसेनेने यापूर्वीच विधान परिषद आमदारांकडून उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

# एनएसई कार्यकारीपदी आशिष कुमार चौहान

■ नवी दिल्ली

**आशिष** कुमार चौहान हे देशातील प्रमुख एक्स्चेंज एनएसईचे पुढील व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी असतील. भांडवली बाजार नियामक सेबीने त्यांच्या नियुक्तीला मान्यता दिली आहे. आशिष कुमार चौहान सध्या बीएसईचे एमडी आणि सीईओ आहेत. एनएसईचे नवीन एमडी म्हणून त्यांची नियुक्ती पाच वर्षांच्या कालावधीसाठी असेल. ते विक्रम लिमये यांच्याकडून पदभार स्वीकारतील, त्यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ काल शनिवारी संपला. पात्र असूनही लिमये यांनी नॅशनल स्टॉक एक्स्चेंजमध्ये मुदतवाढ मागितली नाही. आशिष कुमार चौहान हे एनएसईच्या संस्थापकांपैकी एक आहेत. एनएसई आजवरच्या सर्वात वाईट टप्प्यातून जात असताना ते पदभार स्वीकारणार आहेत. सद्यस्थितीत प्रशासनातील त्रुटी तसेच को-लोकेशन घोटाळ्याचे आरोप होत आहेत. माजी एमडी आणि सीईओ चित्रा रामकृष्ण यांची को-लोकेशन प्रकरणामुळे हकालपट्टी करण्यात आली आहे. त्यांना ईडीने अटक केली आहे. दरम्यान, आयआयटी आणि आयआयएममधून शिक्षण घेतलेले आशिष कुमार चौहान यांना भारतातील आधुनिक आर्थिक डेरिव्हेटिव्हजचे जनक मानले जाते. ते निफ्टी इंडेक्सचा निर्माताही आहेत.

# राज्यात कोरोनाचे २१८६ रुग्ण

■ मुंबई

**राज्यात** आज २१८६ नव्या कोरोना रुग्णांची भर पडली आहे. तर आज दिवसभरात एकूण २१७९ रुग्ण कोरोनामुक्त होऊन घरी परतले आहेत. आज नोंद झालेल्या रुग्णांपैकी सर्वाधिक रुग्ण हे मुंबईतील आहेत. मुंबईत आज सर्वाधिक म्हणजे २७६ रुग्णांची भर पडली आहे. त्याचबरोबर राज्यात बीए ५ व्हेरियंट आणि बीए ४ व्हेरियंटचे १७ रुग्ण आढळले आहेत. राज्यात आज तीन कोरोनाबाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे राज्यातील मृत्यूदर हा १.८४ टक्के इतका झाला. तर आतापर्यंत राज्यामध्ये ७८,५५,८४० कोरोनाबाधित रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत.


**फॉर्म ए**

**जाहीर उद्घोषणा**

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**अलुमेयर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | अलुमेयर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | २९.०१.१९९८ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी कायदा, १९५६ अन्वये कंपनी स्थापित, कंपनी निबंधक, महाराष्ट्र (मुंबई) यांच्याकडे नोंदणीकृत |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U99999MH1998PTC113324 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | कार्यालय क्र. १००२, १०वा मजला, इमारत क्र. ए-१, रुपा सॉलिटायर, सेक्टर-१, एमबीपी, महापे, नवी मुंबई, ठाणे, महा.-४००७१० भारत. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | मान. एनसीएलटी मुंबई खंडपीठाने **दि. ०६ जुलै, २०२२** रोजी आदेश घोषित केला. आदेशाची प्रत **दि. १५ जुलै, २०२२** रोजी प्राप्त झाली. |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | **२ जानेवारी, २०२३** |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | **नावः** श्री. राजस श्रीराम बोडस<br>नोंदणी क्र.<br>IBBI/IPA-002/IP-N01200/2021-2022/14010 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | सर्व्हे क्र. ९९७/१८, सत्संग सोसायटी, सुरक्षा अपार्टमेन्ट, नवी पेठ, वैकुंठजवळ, पुणे, महाराष्ट्र - ४११०३०.<br>ईमेल : rajasbodas1@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | सर्व्हे क्र. ९९७/१८, सत्संग सोसायटी, सुरक्षा अपार्टमेन्ट, नवी पेठ, वैकुंठजवळ, पुणे, महाराष्ट्र - ४११०३०.<br>ईमेल : alumayercirp@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | **२९ जुलै, २०२२** |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम(६अ) च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही. |
| १३. | वर्गामधील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे) | लागू नाही. |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि<br>(ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेलः | वेबलिंकः https://ibbi.gov.in/en/home/downloads<br>लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी दिनांक ६ जुलै, २०२२ रोजी अलुमेयर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. अलुमेयर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह २९ जुलै, २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.

वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.

नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय धनकोने, फॉर्म सीएमधील वर्गाचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहण्याकरिता नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी म्हणून त्यांची पसंती नमूद करावी. (लागू नाही)

दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सदर प्रकटीकरण हे कायदेशीर तरतुदीनुसार स्थानिक भाषेत भाषांतरित केलेले आहे. इंग्रजी भाषेतील सार्वजनिक प्रसिद्धीपत्रक सर्व कायदेशीर बाबी व संदर्भासाठी गृहीत धरण्यात येईल.

सही/-
**श्री. राजस श्रीराम बोडस**
अंतरिम ठराव व्यावसायिक
**दिनांकः** १८ जुलै, २०२२
**ठिकाणः** पुणे
नोंदणीकरण क्र. IBBI/IPA-002/IP-N01200/2021-2022/14010


# काँग्रेसमध्ये दिवाळखोरी प्रकाश आंबेडकरांची टीका

■ अकोला

**राष्ट्रपती** निवडणुकीवरून वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली आहे. काँग्रेसने एका आदिवासी समाजातील व्यक्तीला उमेदवारी दिली पाहिजे होती. राष्ट्रपतीपदाचा उमेदवार हा आदिवासी असावा, असे मी अगोदरच विरोधकांना कळवले होते. काँग्रेसने अक्कलशून्य कारभार केला. काँग्रेस दिवाळखोरीचे राजकारण करत आहे. भाजपने आदिवासी उमेदवार दिला. तो आपल्याला देता आला नाही. हे मान्य करायला हवे होते. पण तेवढी दानत काँग्रेसकडे नाही असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. एनडीए द्रौपदी मुर्मू यांना उमेदवारी दिली आहे. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी देखील मुर्मू यांना आपला पाठिंबा दिला आहे. यशवंत सिन्हा यांनी या निवडणुकीतून माघार घ्यावी अशी विनंती देखील केली आहे. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी आज मतदान होणार आहे. २१ जुलैला मतमोजणी आहे. विरोधी पक्षांच्या संयुक्त आघाडीचे राष्ट्रपतीपदाचे उमेदवार यशवंत सिन्हा यांनी आपली उमेदवारी दिली आहे.

# शिंदे गट व ठाकरेंची दोन दिवसांत भेट

» पान १ वरून

गटांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करत आहे. मला एकनाथ शिंदेंनी शिवसेनेत आणले. पण माझे नेते पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आहेत. येत्या दोन दिवसांत दोन नेते भेटणार आहेत. तुम्हाला ते दिसेल. मध्यस्थी करणारा भाजप नेता कोण हेही तुम्हाला लवकरच कळेल. सगळ्यांनी एकत्र यावे आणि एकत्र बोलावे, अशी सर्वांची इच्छा आहे. शहाजी बापू आणि दिपक केसरकर यांच्या वक्तव्यात जाणवले की, सर्वांनी एकत्र आले पाहिजे. मात्र त्यात मानअपमान आड येत आहे. ही मानअपमानाची बाब सोडण्याचे काम मी करते आहे, त्यात मला यश येईल. मला दोन गट नको होते. तुटलेले घर एकत्र यावे असे एक कार्यकर्ता म्हणून मला वाटते. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचीही हीच इच्छा आहे. उद्धव ठाकरेंकडे आम्ही वडीलधारे म्हणून पाहतो. त्यांनी आणि आदित्य ठाकरेंनी सांगितले आहे की, चर्चासाठी मातोश्रीचे दरवाजे खुले आहेत. ते हाक मारत आहेत. साहेबांनी बोलावले आहे. मात्र शिंदे गटाकडून कोणीच बोलत नाही. कुठे तरी, काही तरी अडत आहे. ते तोडण्याचे माझे प्रयत्न सुरू आहेत. प्रत्येकानं शांत राहण्याचा पवित्रा घेतला तर काही अडचण येणार नाही. लवकरात लवकर पुन्हा एकदा शिवसेना एकत्र यावी एवढीच इच्छा आहे. राऊत आक्रमक आणि परखड बोलतात. पक्षाची भूमिका मांडतात. ते बिनधास्त आहेत. त्यांची भाषाशैली तशीच आहे. शिवसेनेला पाठिंबा देणे, ही भावना त्यांच्या बोलण्यातून वेळोवेळी दिसून येते. संजय राऊत त्यांचे काम करत आहेत. भाजपलाही त्याच पद्धतीने बोलतात. परंतु, राऊतांनीही थोडी शांतता घ्यावी आणि ठाकरे-शिंदे यांना एकत्र आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही दीपाली सय्यद शेवटी म्हणाल्या. दीपाली सय्यद यांच्या या पत्रकार परिषदेनंतर शिवसेनेचे दोन्ही गट एकत्र येऊन भाजपला समर्थन देत सरकार स्थिर करणार का? ही चर्चा जोर धरत आहे. किंबहुना शिंदे गट बाहेर पडला तेव्हा मविआतून बाहेर पडण्यासाठी उद्धव ठाकरे यांनीही ही चाल खेळल्याची चर्चा होती. आता हे गट एकत्र आले तर ही चर्चा खरी ठरेल.

# एटीएम फोडणाऱ्या चोरट्यांना पकडले

■ मुरबाड, प्रतिनिधी

**मुरबाड** पोलिसांनी गेल्या १० महिन्यांपासून रात्री व दिवसा पोलीस ठाणे हद्दीत रिंग राऊंड गुन्हे प्रतिबंधक गस्त सुरू केली आहे. याचा जबरदस्त परिणाम दिसून आला आहे. गेल्या आठ नऊ महिन्यात मुरबाड शहरात रात्री चोरीचे गुन्हे घडले नसल्याचे समोर आले आहे. मात्र १४ तारखेच्या रात्रीला शहरातील पोतदार शॉपिंग सेंटर मधील वेदांत सोनोग्राफी सेंटरचा दरवाजा तोडून त्याची आतली भिंत तोडून आयआयएफएल गोल्ड लोन शाखेत घुसून लुटण्याचा प्रयत्न झाला होता. याबाबत डॉ. बेंदारी यांनी तक्रारही केली होती. मात्र दुसऱ्याच दिवशी मुरबाड पोलिसांना रिंग राऊंड पेट्रोलिंगमध्ये चोरट्यांना रंगेहाथ पकडण्यात यश मिळाले. रात्री १२ ते पहाटे ५ वाजेपर्यंत मुरबाड पोलिसांचे अधिकारी व अंमलदार सतत गस्त घालत असतात.




नवा काळ
मुंबई ■ सोमवार १८ जुलै, २०२२ ■ पान- ८



१९९२ साली 'राजू बन गया जेंटलमॅन' या चित्रपटात अभिनेते नाना पाटेकर हे दैनिक 'नवाकाळ'चा अंक वाचत असतानाचे छायाचित्र.

# पीएम मोदींसह योगींचे फोटो कचऱ्यात कंत्राटी सफाई कामगार निलंबित

■ मथुरा

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे फोटो कचऱ्याच्या गाडीतून नेत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर महापालिकेत खळबळ उडाली आहे. या प्रकरणात कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यास दोषी मानून त्यास निलंबित करण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वृंदावन महापालिका कार्यालयाजवळील सुभाष इंटर कॉलेजजवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे फोटो कचऱ्यात फेकण्यात आले. शनिवारी कचराकुंडीतील हे चित्र समोर आल्यानंतर महापालिकेत



घबराट निर्माण झाली होती. या प्रकरणानंतर तातडीने कारवाई करत कंत्राटी सफाई कामगारास निलंबित करण्यात आले आहे. कंत्राटी सफाई कामगार दुलीचंद हा कचरा उचलत होता. येथे कचऱ्याच्या ढिगाऱ्यात स्वच्छता करताना पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री योगी यांचे फोटो कुणीतरी टाकले होते. येथून जात असलेल्या राजस्थानच्या भाविकांनी या सफाई कामगाराला अडवले. यावरून त्यांनी वाद घालण्यास सुरुवात केली. काही लोकांनी मध्यस्थी करून कचऱ्यातून फोटो काढले.

# हार्दिक पंड्याचा भेदक मारा भारताला २६० धावांचे लक्ष्य

■ मँचेस्टर

**भारत** आणि इंग्लंड यांच्यातील वनडे मालिकेतील शेवटचा सामना आज मँचेस्टरच्या मैदानावर खेळला गेला. या सामन्यात हार्दिक पंड्या आणि युजवेंद्र चहल यांच्या भेदक गोलंदाजीसमोर इंग्लंडच्या संघाने गुडघे टेकले. हार्दिकने ४ तर चहलने ३ गडी बाद केले. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडने ४५.५ षटकांत २५९ धावा केल्या.

नाणेफेक जिंकून भारताचा कर्णधार रोहित शर्माने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. टीम इंडियासमोर इंग्लंडची टॉप ऑर्डर पूर्णपणे अपयशी ठरली. झटपट धावा काढण्याच्या नादात इंग्लंडच्या फलंदाजांनी आपल्या विकेट्स गमावल्या. इंग्लंडकडून कर्णधार जोस बटलरने सर्वाधिक ६० धावा केल्या. बटलरशिवाय जेसन रॉयने ४१ धावा, मोईन अलीने ३४ धावा, क्रेग ओव्हरटनने ३२ धावा केल्या. तसेच बेन स्टोक्स आणि लियाम लिव्हिंगस्टोनने प्रत्येकी २७-२७ धावांचे योगदान दिले. भारताकडून हार्दिक पंड्याने शानदार गोलंदाजी करत ७ षटकांत २४ धावा देत ४ विकेट्स घेतले. तर युजवेंद्र चहलने तीन आणि मोहम्मद सिराजने दोन आणि रवींद्र जडेजाने एक विकेट घेतली.

# औरंगाबादेत नीट परीक्षेच्या आदल्या दिवशी विद्यार्थिनीची गळफास लावून आत्महत्या

■ औरंगाबाद

**नीट** परीक्षा एक दिवसावर आली असताना एका विद्यार्थिनीने गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली आहे. औरंगाबाद शहरातील मुकुंदवाडी परिसरातील जयभवानी नगरमध्ये काल शनिवारी रात्री ही घटना घडली. ऋतुजा गणेश शिंदे (१८) असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे.

ऋतुजा शिंदे ही विद्यार्थिनी नीट परीक्षेचा अभ्यास करत होती. ऋतुजाला बारावी परीक्षेत चांगले गुण मिळाले होते. त्यामुळे तिने नीट परीक्षेची तयारी सुरू केली होती. मात्र पहिल्या परीक्षेत तिला कमी गुण मिळाले. त्यामुळे ऋतुजाने पुन्हा दुसऱ्यांदा परीक्षेची तयारी



केली. दरम्यान परीक्षा एका दिवसावर आली असताना शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास ऋतुजाने गळफास घेत आपली जीवनयात्रा संपवली.

ऋतुजाने नेमकी आत्महत्या का केली? याची माहिती अद्यापही समोर आलेली नाही. मात्र, परीक्षेच्या तणावातून तिने आत्महत्या केली असल्याचा

**मुकुंदवाडी परिसरातील नागरिकांमध्ये हळहळ**

अंदाज नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. ऋतुजा अभ्यासात प्रचंड हुशार होती. तसेच तिचा स्वभावही मनमिळावू होता. तिने असे अचानक टोकाचे पाऊल उचलल्याने परिसरातून मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

# पालघरमध्ये जुन्या शिवसैनिकांना पुन्हा मोठी संधी! नव्याने नियुक्त्या

■ पालघर

**पालघरमध्ये** शिवसेनेला खिंडार पडल्यानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पालघर जिल्ह्यातील जुन्या



शिवसैनिकांना पुन्हा संधी देत मोठी जबाबदारी दिली आहे. पालघर जिल्ह्यातील शिवसेना वाचवण्यासाठी आणि बंडखोरीला प्रत्युत्तर देण्यासाठी शिवसेनेने पालघरमध्ये नव्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.

पालघरमध्ये शिवसेनेला खिंडार पडल्यानंतर नव्याने शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या काळातील जुन्या शिवसैनिकांना पक्षाकडून पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. यात उदय बंधू पाटील यांची उपनेतेपदी निवड करण्यात आली आहे. तर एकनाथ शिंदे यांचे विरोधक असलेले माजी जिल्हाप्रमुख उत्तम पिंपळे यांची पालघर, भिवंडी आणि ठाणे लोकसभा समन्वयक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वैभव संखे, वसंत चव्हाण आणि पंकज देशमुख या तिघांची शिवसेना जिल्हा प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# कालीमातेच्या मंदिरावर खलिस्तानी पोस्टर लावल्याने पतियाळात तणाव

■ पतियाळा

**देशाच्या** काही भागात सध्या धार्मिक तणावाचे वातावरण आहे. कालीमातेच्या वाद्ग्रस्त

**■ मंदिर परिसरात पोलिसांचा बंदोबस्त**

पोस्टरवरून सुरू असलेला वाद अजूनही शमलेला नाही. त्यानंतर आता पतियाळा मध्ये कालीमातेच्या मंदिरावर खलिस्तानी पोस्टर लावले गेल्याने पुन्हा नव्या वादाला तोंड फुटले आहे.

पतियाळामध्ये कालीमातेचे मंदिर आहे. याच मंदिराच्या मागच्या बाजूला शेरोवाला गेट आहे. त्याच गेटच्या आतल्या



बाजूला असलेल्या छोट्या गेटच्या आत जाऊन कुणीतरी अज्ञात व्यक्तीने हे पोस्टर लावले होते. मात्र पोलिसांना याबाबतची माहिती समजताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन हे पोस्टर काढून टाकले. पोलिसांनी या घटनेची माहिती लपवली होती. मात्र सोशल मीडियावरून या पोस्टरला जोडून २७ एप्रिलची क्लिप व्हायरल झाल्यानंतर लोकांमध्ये संताप पसरला. कारण २९ एप्रिलला या मंदिरावर हल्ला झाला होता. तशा प्रकारची घटना पुढे घडू नये यासाठी मंदिर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त वाढवला आहे. तसेच मंदिराच्या भिंतीवर खलिस्तानचे पोस्टर लावणाऱ्याचा आता पोलीस शोध घेत आहेत.

# आयसीएसई दहावी बोर्ड परीक्षेत पुण्याची हरगुण कौर देशात पहिली

■ नवी दिल्ली

**आयसीएसईच्या** दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल आज जाहीर करण्यात आला. या परीक्षेत पुण्याच्या सेंट मेरिज शाळेची विद्यार्थिनी हरगुण कौर माथरू ही देशात पहिली आली आहे. तिला ९९.८० टक्के गुण मिळाले आहेत.

कोरोना परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात आयसीएसई दहावी बोर्डाची परीक्षा दोन सत्रात झाली होती. पहिल्या सत्राची परीक्षा नोव्हेंबर-डिसेंबर २०२१ मध्ये तर दुसऱ्या सत्राची परीक्षा एप्रिल-मे २०२२मध्ये झाली होती. आता या दोन्ही परीक्षांना समान वेटेज देऊन अंतिम निकाल जाहीर केला आहे. आज आयसीएसई दहावी बोर्ड परीक्षेचा एकूण निकाल ९९.९७ टक्के लागला. तर आयसीएसई दहावी बोर्ड परीक्षेत महाराष्ट्राचा १०० टक्के निकाल लागला आहे. या परीक्षेत पुण्याची हरगुण कौर माथरू, कानपूरमधील अनिका गुप्ता, लखनऊ येथून कनिष्क मित्तल, बलरामपूरचा पुष्कर त्रिपाठी या चारही विद्यार्थ्यांना ९९.८० टक्के गुण प्राप्त झाले आहेत.

या चारही विद्यार्थ्यांनी देशात पहिला येण्याचा मान पटकावला आहे. या परीक्षेसाठी २,३१,०६३ मुलांनी देशभरातून तर २६,०८३ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातून आयसीएसई दहावी बोर्ड परीक्षा दिली होती. त्यातून देशभरातून १,२५,६७८ मुले, तर १,०५,३८५ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत.

# पुलवामात दहशतवादी हल्ला सीआरपीएफचा जवान शहीद

■ पुलवामा

**दक्षिण** काश्मीरच्या पुलवामातील गोंगू क्रॉसिंग परिसरात रविवारी दहशतवाद्यांनी सुरक्षा दलाच्या पथकावर हल्ला केल्याने एकच गोंधळ उडाला. या हल्ल्यात एएसआय विनोद कुमार शहीद झाले. या हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी जोरदार मोर्चेबांधणी करत दहशतवाद्यांना शोधण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे.

रविवारी दुपारी दक्षिण काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यातील गोंगू क्रॉसिंगजवळील गोलाकार रस्त्यावर पोलीस आणि सीआरपीएफचे संयुक्त पथक तपासणीत गुंतले होते. त्यावेळी तेथील सफरचंदाच्या बागेतून दहशतवाद्यांनी गोळीबार केला. यादरम्यान सीआरपीएफचे एएसआय

**दहशतवाद्यांची शोधमोहीम सुरू**

विनोद कुमार गंभीर जखमी झाले. जखमी विनोद कुमारला रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. हल्लेखोरांना पकडण्यासाठी परिसराची नाकेबंदी करण्यात आली आहे.

# पुण्यात टँकरच्या धडकेत १ ठार

■ पुणे

**शहरातील** हडपसरमधील महंमदवाडी रस्त्यावर अपघात झाल्याचे समोर आले आहे. हडपसर भागातील महंमदवाडी पोलीस चौकीसमोर पाणी वाहतूक करणाऱ्या टँकरच्या धडकेने एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. पांडुरंग सुखदेव पेठे (५५, रा. साठेनगर, तरवडे वस्ती, महंमदवाडी रस्ता, हडपसर) असे मृत्युमुखी पडलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी टँकरचालक मारुती माधव बोयणे (४१) याला पोलिसांनी अटक केली आहे. पांडुरंग पेठे हातगाडीवर भंगार माल गोळा करण्याचे काम करतात.

# पोलिसांचा बंदी आदेश धुडकावला तुंगारेश्वरात पर्यटकांची प्रचंड गर्दी

**राज्यभरातून पर्यटक पोहोचले**

■ वसई

**सध्या** प्रशासनाकडून पर्यटकांना पर्यटनस्थळी जाण्यास बंदी घातली आहे. मात्र तरीही पावसाळा सुरू झाल्याने अनेक ठिकाणी पर्यटकांची गर्दी होताना पहायला मिळत आहे. त्यात अनेक पर्यटक अनेक ठिकाणी राज्यभरातून दाखल होत असल्याचे पहायला मिळते. त्यामुळे वाहतुकीचा विचार करता, तसेच अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली असल्याने प्रशासनाकडून पर्यटकांना अशा अनेक



ठिकाणी जाण्यास निर्बंध घातले असतानाही प्रशासनाचे त्याचबरोबर स्थानिक पोलिसांचे आदेश धुडकावत रविवारी अनेक ठिकाणी पर्यटकांची गर्दी पहायला मिळाली.

मिळालेल्या माहितीनुसार, गेले अनेक दिवस सततच्या पावसामुळे अनेक ठिकाणी पर्यकांना बंदी घातली असतानाही अनेक पर्यटक आपला जीव धोक्यात घालत असल्याचे समोर आले आहे. बाहेर फिरण्यासाठी आल्यावर कुठलेही नियम पाळताना ते दिसत नाहीत. दरम्यान, सततच्या पावसामुळे वसईतील तुंगारेश्वर धबधबा ओसंडून वाहत आहे. मात्र पावसामुळे होणाऱ्या दुर्घटना लक्षात घेता पोलिसांनी तुंगारेश्वर धबधब्यावर जाण्यास पर्यटकांना बंदी घातली आहे.

पोलिसांनी धबधब्यावर जाण्यास मज्जाव केला असतानादेखील पर्यटक धबधबा परिसरात गर्दी करत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे पोलिसांच्या आदेशाला पर्यटकांकडून हरताळ फासला जात असल्याचेच पहायला मिळत आहे.

# झारखंडमध्ये धरणात बोट उलटली! ८ बेपत्ता

■ रांची

**झारखंडच्या** गिरिडीहमध्ये बोट उलटल्यानंतर ८ जण बेपत्ता झाल्याने एकच खळबळ उडाली. धनवार ब्लॉकमधील गोरहंद आणि कोडरमाच्या मार्कच्या सीमेवर असलेल्या पंचखारो धरणात ही घटना आज घडली. स्थानिक प्रशासनाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून त्यांचा शोध घेतला जात आहे. या बोटमध्ये १० जण जात होते. धनवार ब्लॉकमधील गोरहंद आणि कोडरमाच्या सीमेवर असलेल्या पंचखारो धरणात एका छोट्या बोटीतून १० जण प्रवास करत होते. प्रवासादरम्यान बोट उलटली. त्यानंतर यातील दोनजण पोहून बाहेर आले, तर ८ जण धरणात बुडाले. या घटनेची माहिती मिळताच धरणाजवळ नागरिकांची गर्दी झाली. घटनास्थळी प्रशासनाचे पथक बेपत्ता लोकांचा शोध घेत आहे. बुडालेले सर्वजण धन्वार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी आहेत. पोलीस ठाण्याचे प्रभारी नागेंद्र कुमार घटनास्थळी पोहोचले आहेत.

# तामिळनाडूत विद्यार्थिनीची आत्महत्या संतप्त आंदोलकांनी बसेस जाळल्या

■ चेन्नई

**तामिळनाडूच्या** कल्लाकुरीची जिल्ह्यात एका खासगी शाळेतील बारावीची विद्यार्थिनी बुधवारी पहाटे वसतिगृहाच्या आवारात मृतावस्थेत आढळून आली. या घटनेनंतर आज झालेल्या निदर्शनांना हिंसक वळण लागले. विविध विद्यार्थी संघटना आणि स्थानिक लोकांनी शाळेच्या आवारात उभ्या असलेल्या बसेस पेटवून दिल्या. तसेच शाळेच्या मालमत्तेची तोडफोडही केली. पोलिसांच्या गाड्यांनाही आग लावण्यात आली. विद्यार्थिनीच्या मृत्यूमागे कट असल्याचा आरोप करत मृतूला जबाबदार असलेल्यांना अटक करण्याची मागणी संतप्त आंदोलकांकडून करण्यात आली. कुड्डालोर जिल्ह्यातील रहिवासी असलेली विद्यार्थिनी बुधवारी पहाटे वसतिगृहाच्या आवारात मृतावस्थेत आढळून आली. मुलीच्या कुटुंबियांनी आणि नातेवाइकांनी तिचा



मृतदेह स्वीकारण्यास नकार दिला. मुलीच्या शवविच्छेदन अहवालामध्ये रक्तस्राव आणि अनेक जखमांमुळे तिचा मृत्यू झाल्याचे म्हटले आहे. शरीरावरील सर्व जखमांच्या खुणा ताज्या होत्या. या मुलीने लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये शाळेतील शिक्षकांनी छळ केल्याचा आरोप केला आहे. या घटनेची सखोल चौकशी व्हावी या मागणीसाठी कुटुंबीय, नातेवाईक आणि स्थानिक लोक अनेक दिवसांपासून आंदोलन करीत आहेत. आज चिन्ना सालेम-कल्लाकुरीची रस्त्यावर मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि स्थानिकांनी वाहतूक रोखून धरली.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आ. किशोर पाटलांकडून सत्कार

■ मुंबई

**महाराष्ट्राचे** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्रिपदी निवड झाल्याने शिंदे गटाचे आमदार किशोर अप्पा पाटील यांनी मुंबईत त्यांच्या सत्कारार्थ जाहीर कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात भाषण करताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मी मुख्यमंत्री झालोय यावर विश्वासच बसत नाही.

ते म्हणाले की, राज्यात नवं वातावरण दिसत आहे. लोक कानाकोपऱ्यातून येत आहेत. मुंबईतही कुणाच्या चेहऱ्यावर थकवा कधीच दिसत नाहीय. मी मुख्यमंत्री झालोय यावर विश्वासच बसत नाही. मी एकटा नाही हे सर्व माझ्यासोबतचे आमदार मुख्यमंत्री आहेत. एक-एक कार्यकर्ता स्वतः ला मुख्यमंत्री समजू लागला हे चित्र पहिल्यांदाच राज्यात दिसलं. हे राज्य सर्वांचं आहे. बाळासाहेबांचे हिंदुत्व, दिघे साहेबांचे विचार आम्ही घेऊन पुढे चाललो आहोत. मुस्लीम बांधवांनाही एकनाथ शिंदे आमच्याच कुटुंबाचा भाग आहे, असे वाटत असल्याचा दावा शिंदे यांनी केला. पुढे बोलताना ते म्हणाले की, एकाही आमदारानं मुंबईहून निघताना कुठे जातोय, का जातोय विचारले नाही. अडीच वर्ष ऐकायला मीच एकटा मोकळा होतो. सर्वजण माझ्याजवळ येऊन व्यथा मांडायचे. पुढच्या निवडणुकीत भूमिका कोणती घ्यायची? शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे काँग्रेस-राष्ट्रवादीपासून लांब राहा म्हणायचे. हे टोकाचं पाऊल उचलण्याची भूमिका आमदारांनी घेतली.

# सिंगापूरला जाऊ न देणे अत्यंत चुकीचे अरविंद केजरीवालांचे नरेंद्र मोदींना पत्र

■ नवी दिल्ली

**दिल्लीचे** मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहिले आहे. या पत्रात केजरीवाल यांनी सिंगापूरला जाण्याच्या परवानगीवरील बंदी चुकीची असल्याचे म्हटले आहे. एखाद्या मुख्यमंत्र्यांना देशहिताच्या कामासाठी जाण्यापासून रोखणे हे देशहिताच्या विरोधात असल्याची नाराजी त्यांनी या पत्रातून व्यक्त केली आहे. तेव्हा लवकरात लवकर परवानगी द्यावी, असेही केजरीवाल यांनी पत्राद्वारे स्पष्ट केले आहे.

दरम्यान, केंद्राकडून परवानगी मागून एक महिन्याहून अधिक काळ लोटला आहे, परंतु अद्याप परवानगी मिळालेली नाही, असेही केजरीवाल यांनी म्हटले आहे. अरविंद केजरीवाल १ ऑगस्ट रोजी सिंगापूर येथे होणाऱ्या वर्ल्ड सिटी कॉन्फरन्समध्ये दिल्लीचे मॉडेल सादर करणार



आहेत. सीएम केजरीवाल यांनी ७ जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींना यासंदर्भात एक पत्रही लिहिले होते.

सीएम अरविंद केजरीवाल यांनी पीएम मोदींना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, मला सिंगापूर सरकारने वर्ल्ड सिटी कॉन्फरन्समध्ये दिल्ली मॉडेल सादर करण्यासाठी बोलावले आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात होणाऱ्या या परिषदेसाठी जगभरातील बडे नेते सिंगापूरमध्ये येत आहेत. दिल्ली त्याच्यासमोर सादर करणे हा भारतासाठी खूप अभिमानाचा क्षण असेल. या महत्त्वाच्या मंचाला भेट देण्यापासून रोखणे चुकीचे आहे. पत्रात पुढे लिहिले आहे की, मला अत्यंत दुःखाने सांगावे लागत आहे की, मला अद्याप सिंगापूरला जाण्याची परवानगी देण्यात आलेली नाही. मी दीड महिन्यापूर्वी ७ जून रोजी परवानगी मागणारे पत्र लिहिले होते. यावर अद्याप कोणतेही उत्तर आलेले नाही. अशा प्रकारे एखाद्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना अशा महत्त्वाच्या कार्यक्रमाला येण्यापासून रोखणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.